## राज्यात पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा अंदाज



**मुंबई** : महाराष्ट्रात पुढील दोन विजांच्या कडाकडाटासह पावसाची हजेरी लागण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्रात बहुतेक ठिकाणी आणि दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. अनेक भागात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. रायगड, रत्नागिरीसह पुढील दोन दिवस आणखी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून हवामान विभागाकडून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे हवामान विभागाने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. महाडमध्ये एनडीआरएफची टीम तैनात करण्यात आली आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३३६
www.ramprahar.com

रविवार, २३ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


जीएसटी परिषदेत जनतेच्या हिताचे निर्णय/२

कर्जतमध्ये ३८७५ मतदार बजावणार मतदानाचा हक्क/५

धोनीचा टी-२० वर्ल्डकपमधील विक्रम अबाधित/८


### राज्य सरकारच्या आश्वासनानंतर लक्ष्मण हाके यांचे उपोषण मागे

# अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठकीचे नियोजन

**जालना : प्रतिनिधी**

गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेले ओबीसी आरक्षण बचाव उपोषण शनिवारी (दि.२२) लक्ष्मण हाके यांनी संपवले आहे. मंत्री छगन भुजबळांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ लक्ष्मण हाके यांच्या भेटीला गेले होते. ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागणार नाही, तसेच ओबीसी आरक्षणासंबंधी लक्ष्मण हाके यांच्या मागणीवर राज्य सरकार सकारात्मक असल्याचे आश्वासन त्यांना देण्यात आले आहे.



मंत्री छगन भुजबळांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ लक्ष्मण हाके यांच्या भेटीला गेले होते. त्या वेळी या शिष्टमंडळाने आरक्षणावर राज्य सरकारची काय भूमिका आहे, याची माहिती हाके यांना दिली. त्याच वेळी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी आपले उपोषण मागे घ्यावे, अशी विनंती या शिष्टमंडळाकडून करण्यात आली.

लक्ष्मण हाके म्हणाले, बोगस सर्टिफिकेट देणाऱ्यांवर आणि घेणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्य सरकारने आश्वासन दिले, त्यावर श्वेतपत्रिका काढावी आणि जाहीर करावे. सरकारकडून आम्हाला न्यायाची अपेक्षा आहे. अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठक होणार असून त्यामध्ये चर्चा होऊन निर्णय घेण्यात येईल. सरकारने आश्वासन दिले आहे, त्यामुळे हे आंदोलन स्थगित केले आहे.

#### मुख्यमंत्र्यांनी मानले हाकेंचे आभार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, काल बैठक झाली होती. कालच्या बैठकीत दोन्ही उपमुख्यमंत्री आणि इतरही सर्वजण उपस्थित होते. समाजा-समाजात तेढ निर्माण होऊ नये, यासाठी चर्चा करण्यात आली. मराठा आणि ओबीसी समाजात वाद होवू नये, यासाठी चर्चा झाली. अधिवेशनाच्या काळात काही मुद्द्यांवर सर्वपक्षीय बैठक घेण्याचे ठरवण्यात आले आहे. लक्ष्मण हाके यांनी आंदोलन मागे घेतले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.




## ग्रामीण भागात जातीद्वेष वाढतोय ही चिंतेची बाब

### साहित्यिक रामदास फुटाणे यांनी व्यक्त केली खंत

**पनवेल : प्रतिनिधी**

महानगरापेक्षा ग्रामीण भागात जातीय द्वेष, धर्मद्वेष अधिक उफाळत आहे. त्यामुळे येत्या पाच वर्षांत काहीही घडू शकते, अशी भीती ज्येष्ठ साहित्यिक रामदास फुटाणे यांनी व्यक्त केली. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापन दिनी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या वेळी विविध पुरस्कारांनी उल्लेखनिय काम केलेल्या पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

#### मुंबई मराठी पत्रकार संघाचा वर्धापन दिन साजरा

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापन दिनानिमित्त संघाच्या पत्रकार भवनातील सभागृहात शुक्रवारी (दि.२१) साहित्यिक रामदास फुटाणे यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या वेळी रायगडचे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांना विशेष सन्माननीय सदस्यत्व देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे होते.

२०२१ या वर्षीचा आचार्य अत्रे पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांना प्रदान करण्यात आला. विविध पुरस्कारात पद्मश्री यमुनाताई खाडिलकर स्मृती पुरस्कार पंकज दळवी, कविवर्य प्रा. भालचंद्र खाडिलकर स्मृती पुरस्कार प्रमोद तेंडुलकर, समतानंद अनंत हरि गद्रे पुरस्कार विजयकुमार बांदल, वृत्तछायाचित्रकार संतोष बने, **(पान २ वर..)**

#### सदस्यत्व दिल्याबद्दल मनस्वी आनंद -लोकनेते रामशेठ ठाकूर

तुम्ही मला मुंबई मराठी पत्रकार संघाचे अधिकृत सदस्यत्व दिलेत याचा मला मनस्वी आनंद झाला आहे कारण अनेक पत्रकारांशी माझा संबंध येत होता, पण तो बाहेरून येत होता. माझ्याशी संबंधित असलेल्या पत्रकारांनी मला वृत्तपत्र काढण्याचा सल्ला दिला. त्यामुळेच दैनिक रामप्रहर सुरू केले. आज या संघाचे विश्वस्त असलेले देविदास मटाले त्याचे संपादक आहेत. मला पनवेलमध्ये पत्रकार मित्र म्हटले जाते. मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे साहेब आणि माझ्या नेहमी भेटी होत असतात. लोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्यामार्फत गेली अनेक वर्षे राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा घेण्यात येते. नरेंद्र वाबळे साहेब यांनी सूचविल्याप्रमाणे येथील दुरूस्तीचे काही काम मी करून दिले आहे. आता लोणावळ्याला असलेल्या विश्रामधामाचे काम त्यापेक्षा जास्त खर्च करून मी लवकरच पूर्ण करून देईन. मला आपण सदस्यत्व दिल्याबद्दल मी आपणा सर्वांचा आभारी आहे.

## स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीला बसणार आळा

**१० वर्षांचा कारावास ते एक कोटी दंड**

**केंद्र सरकारतर्फे कायदा लागू**

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) पेपर लीकप्रकरणी देशभर गदारोळ झाल्यानंतर केंद्र सरकारने शुक्रवारी (दि.२१) कठोर कायद्याची अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक परीक्षांमधील गैरप्रकार आणि अनियमितता रोखता येणार आहे. शुक्रवारी रात्रीपासून लागू झालेल्या या कायद्यात गुन्हेगारांना कमाल १० वर्षांचा तुरुंगवास आणि एक कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.

परीक्षा प्राधिकरण, सेवा पुरवठादार किंवा इतर कोणत्याही संस्थेसह एखादी व्यक्ती किंवा व्यक्तीच्या गटाने संघटित गुन्हा केल्यास, त्यांना पाच वर्षांपेक्षा कमी नसलेल्या परंतु दहा वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि दंड एक कोटी रुपयांची तरतूद या कायद्यात नमूद करण्यात आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे, बँकिंग भरती परीक्षा आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतलेल्या सार्वजनिक परीक्षांमध्ये अन्यायकारक मार्ग रोखणे हे या कायद्याचे उद्दिष्ट आहे.

या वर्षी फेब्रुवारीमध्ये संसदेने सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ मंजूर केला होता. या कायद्यात फसवणुकीला आळा घालण्यासाठी किमान तीन ते पाच वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे आणि फसवणुकीच्या संघटित गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांना पाच ते दहा वर्षांचा तुरुंगवास आणि किमान शिक्षेची तरतूद आहे, तसेच एक कोटी रुपयांच्या दंडाचीही तरतूद करण्यात आली आहे. या कायद्याची अंमलबजावणी शुक्रवारी मध्यरात्रीच करण्यात आली.

## महाडमध्ये गोवंश हत्येविरोधात भव्य निषेध मोर्चा



**महाड : प्रतिनिधी**

महाडजवळील इसाने कांबळे येथे काही दिवसांपूर्वी झालेल्या गोवंश हत्या करण्यात आली होती. या वेळी हिंदू समाजाचे कार्यकर्ते आणि पोलीस कर्मचारी यांच्यावर मुस्लिम जमावाने हल्ला केला. प्रशासनाचा जाहीर धिक्कार करण्यासाठी सकल हिंदू समाज रायगड जिल्ह्याच्या वतीने चवदारतळे येथून प्रांताधिकारी कार्यालयावर शनिवारी (दि.२२) भव्य मोर्चा काढण्यात आला.

चवदार तळे येथून या मोर्चाला प्रारंभ करण्यात आला. संपूर्ण बाजारपेठेतून गोवंश हत्या आणि गोरक्षक पोलीस कर्मचाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यात आला. **(पान २ वर..)**



पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या मॅनजिंग कौन्सिलचे सदस्य ॲड. रवींद्र पवार, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. ए. पवार, डीन डॉ. जे. बी. थोरात, आयक्यूएसी संचालक डॉ. जी. बी. कल्याणशेट्टी यांनी शनिवारी 'रयत'चे मॅनजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर त्यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला भेट देऊन पाहणी केली. 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख उपस्थित होते.







# जीएसटी परिषदेत जनहिताचे निर्णय

## ◆ प्लॅटफॉर्म तिकीटांसह रेल्वेच्या सेवांना सूट, ईव्ही कारसेवाही मुक्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**




केंद्रात मोदी सरकारच्या संसदेतील बहुमतापूर्वी जीएसटी परिषदेने मोठे निर्णय घेतले आहेत. शनिवारी (दि. २२) झालेल्या ५३ व्या बैठकीला अर्थमंत्री निर्मला सीतारामन या उपस्थित होत्या. त्यांनी सौर कुकरवर १२ टक्के जीएसटी लावण्यास मान्यता देण्यात आल्याचे जाहीर केले.

आणखी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. जीएसटी कायद्याच्या कलम ७३ नुसार जारी केलेल्या डिमांड नोटीससाठी व्याज आणि दंड माफ करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच बनावट पावत्या रोखण्यासाठी बायोमेट्रीक प्रणाली टप्प्याटप्प्याने लागू केली जाणार आहे. भारतीय रेल्वेद्वारे पुरवल्या जाणाऱ्या सेवा, प्लॅटफॉर्म तिकिटे, रिटायरिंग रूम, वेटिंग रूम व बॅटरीवर चालणाऱ्या कार सेवांना जीएसटीमधून सूट देण्यात आली आहे.

सध्या आम्ही काही मर्यादित विषयांवरच विचार करू शकत होतो. अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर जीएसटीची आणखी एक बैठक होणार असल्याचे सीतारामन यांनी सांगितले. तब्बल आठ महिन्यांनंतर ही बैठक झाली आहे. या बैठकीत जीएसटी अपील न्यायाधिकरणासाठी २० लाख रुपयांच्या आर्थिक मर्यादेची शिफारस करण्यात आली आहे. तसेच छोट्या व्यापाऱ्यांना GSTR-४ भरण्याची अंतिम मुदत ३० जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे.

याचबरोबर २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वर्षातील डिमांड नोटीसवरील व्याज आणि दंड माफ केला जाणार असल्याची घोषणाही सीतारामन यांनी केली. यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत कर भरावा लागणार आहे. पुढील बैठक ऑगस्टमध्ये घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये आता जिल्हा परिषद शाळेत पहिलीपासून सेमी इंग्रजी

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यात ग्रामीण भागात शैक्षणिक क्रांती झाली आहे. जिल्हा परिषद शाळेमध्ये आता सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू झाले आहेत. तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सात शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू झाले असून पहिली ते सातवी साठी तब्बल ५३९ विद्यार्थ्यांचे प्रवेश पालकांनी केले आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना आता जिल्हा परिषद शाळा स्पर्धा करणार, असा विश्वास शिक्षण अधिकारी संतोष दौंड यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सेमी इंग्रजी माध्यमांचे वर्ग सुरू केले जाणार असल्याची घोषणा राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केली होती. त्यानंतर २०२४ -२०२५ या शैक्षणिक वर्षात कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेच्या सात शाळांमध्ये पहिली टप्प्यात सेमी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू झाली आहे. त्या शाळांबाबत पालक वर्गाला शिक्षण विभाग यांच्याकडून आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार कर्जत तालुक्यातील पालकांनी शिक्षण विभागाच्या आवाहनाला प्रतिसाद देत तब्बल ५३९ विद्यार्थ्यांची नोंद सेमी इंग्रजी माध्यमासाठी आपल्या पाल्यांना पाठवून जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षणावर विश्वास व्यक्त केला आहे.

पहिल्या टप्प्यात वर्ग सुरू होत असलेल्या बांधीवली, पोशीर, नेरळ, आंबोट, कडाव, टाकवे, कळंब येथे हे वर्ग सुरू झाले आहेत. तालुक्यात सर्वाधिक १३१ विद्यार्थी हे नेरळ येथील सेमी इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी प्रवेशकर्ते झाले आहेत. त्यानंतर १०९ विद्यार्थी हे कडाव जिल्हा परिषद शाळेत तर ९० विद्यार्थी कळंब येथील शाळेत सेमी इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला आहे. तर पहिलीच वर्गात १४२ विद्यार्थी यांचे प्रवेश निश्चित झाले असून सर्वाधिक २९ विद्यार्थी हे कळंब येथील पहिलीचे वर्गात शिकू लागले आहेत.

कर्जत पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने ३२ शिक्षकांची निवड सेमी इंग्रजी शाळेसाठी केली आहे. त्यात सर्वाधिक विद्यार्थी हे पहिले ते तिसरे चे वर्गात प्रवेश घेणारे असून पाचवी पर्यंत सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेण्यासाठी पालकांचा कल दिसून येत आहे. यावर्षी सेमी इंग्रजी माध्यमाच्या वर्गांची सुरुवात शिक्षण विभागाने केली आहे. पुढील वर्षी तालुक्यातील आणखी काही शाळांमध्ये सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी माहिती संतोष दौंड यांनी दिली आहे.

## निवडक

### उमेश पेणकर यांचा सत्कार



**मुरूड :** उसरोली गावचे रहिवासी उमेश बाळकृष्ण पेणकर यांची एस.टी महामंडळात गेले ३७ वर्षे सेवा झाली आहे. त्यांनी कंडक्टर (वाहक) म्हणून रायगड जिल्ह्यां मध्ये अनेक ठिकाणी ३५ वर्ष यशस्वी कामगिरी बजावली असून गेले दोन वर्ष ते मुरूड आगार येथे वाहतूक नियंत्रक (कंट्रोल ऑफिसर) म्हणून कार्यरत असताना नियत वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. उसरोली येथील त्यांच्या राहत्या घरी सेवानिवृत्तीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी गावचे अध्यक्ष प्रणय धोंडसेकर व गावकऱ्यांनी त्यांच्या पत्नी समवेत त्यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सत्कार करुन पुढील आयुष्य आनंदमय सुखमय निरोगी जावो आशा शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### गायकांसाठी कराओकेचे व्यासपीठ



**पनवेल :** हौशी कलाकारांसाठी पनवेलमधील इव्हेंट कंपनी ॲडव्हेंचर एंटरटेन्टमेंटने एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. ज्यांना गायनाची आवड आहे अशा कलाकारांसाठी एक व्यासपीठ उपलबध करून दिले आहे. गेल्या चार महिन्यात त्यांनी पाच शो केले आहेत. या उपक्रमाला कलाकारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. पनवेल, उरण, ठाणे, पुणे, उलवे, ऐरोली, लोधिवली, पेण, रसायनी, तळोजा या ठिकाणांहून कलाकार या कार्यक्रमासाठी हजेरी लावत आहेत. हौशी कलाकारांमध्ये स्टेज डेअरींग यावे व कलाकार पुढे जावा ही यामागची भावना असल्याचे कंपनीचे संचालक मंगेश देशपांडे यांनी सांगितले.

# सरपंच रवींद्र कुंभार यांच्यातर्फे वटवृक्षाभोवती कट्ट्याचे बांधकाम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



तुपगाव ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र कुंभार यांनी वडाच्या झाडाभोवताली कट्ट्याचे बांधकाम करून घेतले आहे. या कट्टट्याचा फायदा वटपौर्णिमेनिमित्त पूजा करणाऱ्या महिलांना झाला.

सरपंच रवींद्र कुंभार हे त्यांच्या निस्वार्थ स्वभावाने व त्यांच्या कार्यपद्धतीने चौक तुपगाव पंचक्रोशीत ओळखले जातात. तसेच आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली तुपगाव ग्रामपंचायत हद्दीत विकासाची गंगा आणण्यासाठी सतत प्रयत्नशील अपल्याचे दिसून येते. त्यांनी सरपंच झाल्यापासून अनेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रम, आरोग्य शिबिरे, विविध कॅप, क्रीडा, तरुण वर्गाला नेहमी सहकार्य, गावातील विविध धार्मिक, कार्यात सहभाग घेऊन मदत करत असतात. त्यांनी गावातील पुरातन शंकर मंदिर येथील मोडकळीस आलेली विहीर स्वखर्चातून तिची दुरुस्ती केली. तसेच वटपौर्णिमेला महिलांना वडाची पुजा करताना काही अडथळा येवू नये यासाठी वडाच्या झाडाभोवताली कट्ट्याचे बांधकाम केले.

परिसरातील नागरिकांना सतावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी मी कायमच तत्पर असणार असे सरपंच रवींद्र कुंभार यांनी बोलताना सांगितले.

# बालग्राम अनाथआश्रमात योग दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



ग्रेसफुल हॅन्ड्स ट्रस्टने बालग्राम अनाथआश्रम, पनवेल येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे मोठ्या उत्साहात आयोजन केले. या वेळी ग्रेसफुल हॅन्ड्स ट्रस्टचे अध्यक्ष पायल मधोक, खजिनदार लता कुरियन प्रमुख अतिथी प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे, विशेष कार्यकारीअधिकारी अरविंद मोरे, डॉ. विनायक पाटील व पूनम पाटील आदी उपस्थित होते.

सुरुवात सुमा ललित यांच्या भाषणाने झाली. प्रास्ताविक अध्यक्ष पायल मधोक यांनी करून कार्यक्रमाचे महत्त्व विशद केले. यानंतर पतंजली योग समितीच्या प्रशिक्षकांद्वारे प्रमाणित समूह जया त्रिवेदी, मनीषा माने व स्नेहा गुप्ता यांनी एक तास प्रात्याक्षिकाद्वारे योगासने केली व उपस्थितांना त्याचे महत्त्वसुद्धा अगदी सोप्या पद्धतीने समजावून सांगितले. रिंकू घोष, माया सूर्यकांत जगदाळे, प्राची देशपांडे, मीना मिश्रा, सुरेखा पाटील, सुचित्रा पाटकर, ओजस देशपांडे, ओम सिंग आदींनी कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाच्या यशश्वीतेकरिता अथक परिश्रम घेतले.

ग्रेसफुल हॅन्ड्स ट्रस्टने बालग्राम अनाथ आश्रमास भोजन सुद्धा दिले. लता कुरियन यांनी सर्वांचे आभार मानले.

# जेएसएम महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**



संयुक्त राष्ट्र संघाने निर्धारीत केल्यानुसार, वर्ष २०१५ पासून २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. या अनुषंगाने यु. जी. सी. व मुंबई विद्यापीठ यांनी केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार जेएसएम महाविद्यालयामध्ये शुक्रवारी (दि.२१ ) दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण गायकवाड व प्रा. अश्विनी आठवले, जिमखाना समिती प्रमुख डॉ. रवींद्र चिखले, कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक बी. आर. गुरव, तसेच महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, एन.एस. एस. स्वयंसेवक आणि एन.सी. सी. कॅडेट्स व इतर विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

पतंजली योगपीठ, जिल्हा रायगडचे युवा भारत प्रभारी दिपक गाटे व महामंत्री विजयकुमार शिंदे यांनी यागाचे प्रशिक्षण दिले. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एन. एस. एस. युनिट, एन.सी.सी. युनिट आणि जिमखाना विभाग यांनी संयुक्त विद्यमाने केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अश्विनी आठवले यांनी केले तर डॉ. प्रवीण गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले.

## पान १ वरून

### ग्रामीण भागात जातीद्वेष वाढतोय ही चितेची बाब

सीताराम रावकर स्मृर्ती पुरस्कार लता राजे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप होते. ज्येष्ठ सदस्यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला.

सध्याच्या राजकीय परिस्थितीवर साहित्यिक फुटाणे यांनी परखड भाष्य केले. ते म्हणाले, देशात चित्र विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. काही वर्षांपूर्वी राजकारणी संयमाने बोलत होते. तेव्हा जास्त पक्ष नव्हते, आता पक्ष वाढले आहेत. राजकारण्यांना विचारांचे काही साहिलेले नाही. राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. ही गंभीर बाब आहे. महानगरांपेक्षा ग्रामीण भागात जातीद्वेष, धर्मद्वेश वाढला आहे. अशी परिस्थिती कधीही नव्हती. ग्रामीण भागात पराकोटीचा जातीद्वेश वाढलाय. त्यामुळे येत्या पाच वर्षांत काहीही घडू शकते अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. मी ज्या कविता ४० वर्षांपूर्वी लिहल्या. त्या परिस्थितीत काहीही फरक पडलेला नाही. उलट परिस्थिती अधिकच गंभीर होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

***पत्रकारांनी तटस्थ रहावे :***

*साहित्यिक आणि पत्रकार यांनी एका जातीच किंवा धर्माचे प्रतिनिधीत्व करू नये, तटस्थ रहावे. जे घडतेय, जळतेय त्यावर लिहायला पाहिजे. सध्या कालचे व्यंग आज वास्तव म्हणून समोर येतेय. पत्रकारांना राजकारणी घाबरतात. त्यामुळे पत्रकारांची लेखणी अधिक सशक्त असणे गरजेचे आहे, असे मत साहित्यिक रामदास पुटाणे यांनी व्यक्त केले.*

### महाडमध्ये गोवंश हत्येविरोधात निषेध मोर्चा

हा मोर्चा प्रांत कार्यालयावर पोहचल्यानंतर सकल हिंदू समाजाच्या शिष्ट मंडळाच्या वतीने आपल्या मागण्यांचे निवेदन प्रांताधिकारी डॉ. बाणापुरे यांना देण्यात आले.

या निवेदनात, सकल हिंदू समाजाच्या वतीने गोवंश हत्या, त्यांची तस्करी करणारे व त्यांना पाठिशी घालणाऱ्यांना हद्दपार करावे, त्याचप्रमाणे सामाजिक सलोखा बिघडवणारी इसाने कांबळे येथील घटना ही शेवटची घटना ठरावी व धार्मिक भावना दुखावणाऱ्या कसाई व जिहादींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

या मोर्चाचे नेतृत्व सामाजिक कार्यकर्ते उमेश गायकवाड यांनी केले होते. त्यांनी हिंदूंना जागे होण्याचे आवाहन केले. या वेळी मोर्चात महाड, पोलादपूर, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, रोहा, खोपोली येथील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोलिसांकडून कायदा व सुव्यवस्था रहावी यासाठी कडेकोट बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता.

# चौक येथील श्री स्वामीनारायण गुरुकुल शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक येथील श्री स्वामिनारायण गुरूकुल आंतरराष्ट्रीय शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी श्री स्वामीनारायण गुरुकुलचे संचालक विश्वमंगळदास स्वामींनी योगाविषयीचे महत्त्व विशद केले.

या वेळी पंतजली रायगडसह प्रभारी व सदस्य बुज हास्य क्लब खोपोलीचे दीपक बाळासाहेब मालुसरे, हरीचंद्र आंबुर्ले, लक्ष्मण पवार, प्रतिभा पोतदार, शशिकला पवार यांनी योगसनाचे प्रात्यक्षिके करून दाखविली.

योगाचे महत्त्व सांगताना दीपक मालुसरे म्हणाले की, शरीर आणि मन दोन्हीसह योगाभ्यास करणे समाविष्ट आहे. शरीराचा व्यायाम होतो आणि मन एकाग्र होण्यास मदत होते; हे मन आणि शरीर यांच्यात एक मजबूत बंध निर्माण करण्यास मदत करते.

या वेळी श्री स्वामिनारायण गुरुकुलचे संचालक परमपूज्य विश्वमंगलदास स्वामीजी, ब्रम्हस्वरूप स्वामीजी व गुरुकुलचे मुख्याध्यापक डॉ.पी. हरिबाबू रेड्डी सर, गुरूकुलमधील सर्व शिक्षकवर्ग व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यार्थी रंगले योग अभ्यासात



**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथे आंतरराष्ट्रीय योग दिन २०२४ साजरा करण्यात आला. अमृता विद्यालय आणि शिरवणे विद्यालय, जुईनगरचे विद्यार्थी, कर्मचारी, योग अभ्यासक, अम्मा अनुयायांसह समाजातील विविध वर्गातील लोकांचा सहभाग होता.

कार्यक्रमासाठी विशेष निमंत्रितांमध्ये सुमारे दोन दशकांचा कॉर्पोरेट आयटी अनुभव असलेले सल्लागार सतीश निकम आणि सध्या राज्य संयोजक, फ्रेंड्स ऑफ भाजप, महाराष्ट्र, आणि ६० वर्षांच्या 'रनिंग क्वीन' नीलिमा काळे यांचा समावेश होता.

निकम यांनी मठाचे दरवर्षी योगा दिवस उत्साहाने पाळल्याबद्दल कौतुक केले, तर नीलिमा काळे यांनी तरुण सहभागींना योगाचे फायदे, सकस आहार आणि जीवनात हास्य आणि आनंद टिकवून ठेवण्याची गरज सांगितली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारे स्वामी अव्ययामृतानंद यांनी योगाच्या प्राचीनतेची माहिती दिली. योग सत्राचे संचालन दिव्या सोम यांनी केले, ज्यांनी सहभागींना सूचनांसह मार्गदर्शन केले. विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करिश्मा कथुरिया यांनी केले.

# जन शिक्षण संस्थानमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालय ची योजना जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतील विद्यार्थ्यांसह एकदंत नगर सहाण-अलिबाग या ठिकाणी शुक्रवारी (दि. २१) आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमावेळी संचालक डॉ. विजय कोकणे, अकाउंट मॅनेजर प्रतिक्षा चव्हाण, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी राजश्री नाईक, प्रशिक्षक अस्मिता भोईर, रिद्धी पाटील, अजय पाटील, हिमांशू भालकर, प्रांजल पाटील, नवनाथ पोईलकर, भारती पोईलकर व प्रशिक्षणार्थी उपस्थितीत होते.

## दुखवटा

### शिवाजी कुरघोडे

**पनवेल : वार्ताहर**



पत्रकार अनिल कुरघोडे यांचे वडील शिवाजी काशिनाथ कुरघोडे (वय ८५) यांचे शनिवारी (दि. २२) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

पनवेल येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध पक्षाचे लोकप्रतिनिधी, सगेसोयरे, पत्रकार आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडक

## रिटघर विद्यालयात योग दिन



**पनवेल :** भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर येथे योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी योग मार्गदर्शक ए.ए.पाटील व खुटले मॅडम यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे योगाचे विविध प्रकार घेतले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांनी योग प्रकार केले. प्रास्ताविक पाटील सर व मार्गदर्शन बी.बी. साळुंखे यांनी केले आणि जोशी सर यांनी योग प्रकार विषयी माहिती दिली. शेवटी गंधे मॅडम यांनी आभार मानले.

## फुंडे हायस्कूलमध्ये योग प्रात्यक्षिके



**उरण :** फुंडे विद्यालयातदेखील आंतरराष्टीय योग दिन साजरा करण्यात आला. जनार्दन स्वामी योगाभ्यास मंडळ, नागपूर द्वारा संचालित महिला योगाभ्यास काठेआळी उरण यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना योगासनांची माहिती व महत्व सांगून प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. मंडळाच्या प्रमुख स्वाती पाटील आणि त्यांच्या संपूर्ण टीमने, तसेच क्रीडा प्रमुख दिगंबर पाटील, एच. एन. पाटील, साधना पाटील यांनी विद्यार्थ्यांना योगासनांचे प्रात्यक्षिक दाखविले. काही प्रात्यक्षिके शालेय मैदानावर तर पावसामुळे काही प्रात्यक्षिके ही व्हरांड्यात घेण्यात आली. या योगा प्रात्यक्षिकात विद्यालयाचे प्राचार्य एम.जी.म्हात्रे, सर्व विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले होते.

## पनवेलमध्ये विद्यार्थी गुणगौरव समारंभ

**पनवेल :** येथील वाल्मिकी नगरातील वाल्मिकी बौद्ध सामाजिक संस्थेच्या माध्यमातून, बहुजन विकास संघातर्फे, राष्ट्रीय अध्यक्ष गंगादास वाल्मिकी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी गुणगौरव समारंभ नुकताच पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात झाला. वाल्मिकी बौद्ध संघाचे अध्यक्ष गणेश वाल्मिकी यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. समारंभात, महाराष्ट्र सचिव सोनी चौहान, राजेश चंडालिया, जगदिश खैरालिया यांनीही समाजाप्रती बांधीलकीचे महत्त्व विशाद केले. या समारंभात व.वि. संघाच्या निमंत्रणाप्रमाणे ज्येष्ठ नागरिक संघाचे, नंदकुमार जोशी, मोहन शिरोडकर, अनंतराव सिंगासने, लांजेकर आवर्जुन हजर होते. एकूण ९२ विद्यार्थ्यांना वह्या, पेन देऊन गौरविण्यात आले.

# पनवेल, उरणमध्ये योग दिनानिमित्त विविध कार्यक्रम

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २१) अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला.



या दिनाचे औचित्य साधून सहज योग खारघर संस्थेचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भारतीय योग परंपरा कशी श्रेष्ठ आहे, याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रात्यक्षिक सत्रात मान, खांदे, कंबर, गुढगे आदींचे सूक्ष्म व्यायाम शिकवले व करवून घेतले तसेच प्राणायाम, अनुलोम विलोम फुप्फुसाचे व्यायाम, सूर्यनमस्कार इत्यादींबाबत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून घेतले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी योग ही आपणास मिळालेली अमूल्य भेट असून आज सर्व जगाने योगाचे महत्त्व मानले आहे. या धावपळीच्या जीवनामध्ये नियमित योग करून आपले व परिवाराचे आरोग्य जपण्याचे आवाहन त्यांनी केले.

या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन प्रा डॉ. महेश्वरी झिरपे समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, प्रा. महेश धायगुडे समन्वय आजीवन अध्ययन व विस्तार विभाग तसेच प्रा. प्रथमेश ठाकूर समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना यांनी केले तसेच महाविद्यालयातील सर्व शाखेचे विभाग प्रमुख तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून योगाचे धडे घेतले व सहकार्य केले.

## ‘सीकेटी’त विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी माध्यमिक विद्यालयात योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील आठवी, नववी, दहावीचे विद्यार्थी खूप उत्साहीत होते.

या योग शिबिरात विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, सीकेटी जूनियर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, सीकेटी शाळेचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे व इतर क्रीडा शिक्षक तसेच इतर शिक्षकांनीही या योग शिबिरात सहभाग घेऊन अनेक योगासनांच्या प्रात्यक्षिकात सहभागी झाले होते. कार्यक्रमाला मार्गदर्शिका म्हणून पतंजली योगपिठाच्या सुशीला कौशिक होत्या. यांच्या परिचयाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.



कौशिक यांनी प्राणायाम, वज्रासन पर्वतासन, वक्रासन, भुजंगासन यांसारखे अनेक आसन विद्यार्थ्यांना शिकवली व त्यांच्याकडून करून घेतली. तसेच आपण स्वतःला योग साधनेच्या माध्यमातून कसे निरोगी ठेवू शकतो याची माहिती दिली. तसेच त्यांनीविद्यार्थ्यांना योगाचा इतिहास आणि जीवनातील उपयोगीता सांगितली तसेच सारिका दिवेकर मॅडम यांनी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करून व योग प्रार्थनेने योग शिबिराची सांगता करण्यात केली.

## ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर विद्यालयात योगासनांचे प्रात्यक्षिक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात आंतराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या योग दिनासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व भारतीय जनता पार्टी पनवेल चे संघटक प्रभाकर जोशी उपस्थित होते. त्यांनी सर्वांना या योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या व स्वत:ही सर्वांबरोबर योगासने केली.

हा योग दिन चांगल्या प्रकारे साजरा व्हावा म्हणून विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जाधव सर, जोगदंडे सर, शिक्षिका पवार मॅडम यांनी योग्य नियोजन केले होते. विद्यालयाचे प्र.मुख्याध्यापक खांदेकर सर व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या निशा नायर मॅडम यांनी योग्य ते मार्गदर्शन करून सर्व विद्यार्थ्यांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. योगासनांचे प्रात्यक्षिक व प्रकार विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री संभाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.





## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये विशेष संमेलन

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला. या दिवसाचे औचित्य साधून एका विशेष संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात संस्कृतमधील योगिक प्रार्थना, त्यानंतर योगाची उत्पत्ती, त्याचे महत्त्व आणि या दिवसाच्या उत्सवाची उत्पत्ती याबद्दल माहिती सांगितली. श्री अंबिका योग कुटीर बेलापूर याच्यातर्फे स्कूलमध्ये योग साधनेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर, शालेय मुलांसाठी योगाचे विविध फायदे, इयत्ता सहावी, सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांसह, विद्यार्थ्यांना तणावावर मात करण्यासाठी फायदेशीर असलेल्या विविध आसनांचे वर्णन करण्यात आले.



सर्व विद्यार्थ्यांनी मिळून रोज व्यायाम करण्याचा संकल्प केला. यानंतर शाळेतील मुक्याध्यापक मुक्ता खटावकर मॅडम यांनी योगा हा आपल्या जीवनासाठी किती महत्वाचा आहे हे समजावून सांगितले. या वेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनीसुद्धा या शिबिरात सहभाग घेतला.



**पनवेल : शेकडो पनवेलकरांच्या उपस्थितीत, पतंजली, ब्रह्माकुमारीज व अनेक योग क्लबच्या सहभागातून महापालिकेने आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी महापौर डॉ. कविता चोतमोल, पीएमसी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, पतंजली योग शिक्षक यादव, बीके तारा दीदी, बीके डॉ. शुभदा नील, डॉ. कीर्ती समुद्र, श्वेता संतोष शेट्टी आदी उपस्थित होते.**

## खारघर महिला मोर्चातर्फे योग दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जागतिक योगा दिनाच्या निमित्ताने खारघर महिला मोर्चा तर्फे योग दिन साजरा करण्यात आला बऱ्याच महिलांनी त्याचा लाभ घेतला.

या वेळी योगासनांची नावे सांगून त्याचे उपयोगही सांगण्यात आले योग शिक्षिका म्हणून शकुंतला नेगे मॅडम यांना आमंत्रित केले होते व खारघर महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम करण्यात आला. प्रदेश सोशल मीडिया सदस्य बिना गोगरी, जिल्हा सोशल मीडिया संयोजिका शामला सुरेश, सरचिटणीस कांचन बिर्ला, उपाध्यक्ष अंकिता वारंग, चिटणीस सीमा खडसे, दुर्गादेवी, कोषाध्यक्ष निर्मला यादव, सुशीला शर्माजी, प्रभाग अध्यक्ष नेहा यादव, प्रभागराध्यक्ष स्मिता आचार्य, प्रिया दळवी, कृष्णा पुनिया, जुमा चक्रवर्ती, रंजना नेगी, सोमा विश्वास, मायासिंग, गणपती देवी, जया नायर, नूतन सिंग, राखी वराडे, कमलेश मॅडम यांनी उपस्थित राहून योगा दिनाचा लाभ घेतला.



## सरपंच विजेंद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सरपंच विजेंद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात सरपंच विजेंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोफत वह्या, कंपास बॉक्स, स्कूल बॅगसह आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत भोईर, स्कूल कमिटी सदस्य किसन पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, सदस्य राजेश म्हात्रे, सागर ठाकूर, नरेश मोकल, सी. एल. ठाकूर, गजानन म्हात्रे, मीनाक्षीस पाटील, रयतचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रस्तावना रयतचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी, सूत्रसंचालन उन्नती म्हात्रे यांनी केले तर आभार पीएम ठाकूर यांनी केले.



## जेएनपीएममध्ये महिला सक्षमीकरणासाठी योग

**उरण :** जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने (जेएनपीए) ‘महिला सक्षमीकरणासाठी योग’ या थीमसह आणि बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने सामायिक केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. जनेपप्राच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी विशेष योग सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये आणि समुदायामध्ये आरोग्य आणि कल्याणास प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन आणि समर्थन देते.



## थायलंड येथील शैक्षणिक भेटीबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्रिन्सिपल अविनाश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली भारतातील सीबीएसई स्कूलचे प्रिन्सिपल यांची बँकॉक थायलंड येथील डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशनला शैक्षणिक भेट दिल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले आहे.

प्रिन्सिपल कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली सी.बी.एस.ईचे प्रिन्सिपल डॉ. निकिता कोठारी (इंडॉस्कॉट ग्लोबल स्कूल ठाणे), डॉ. दिपाली शिरगावे (विश्व कल्याण इंग्लिश मीडियम स्कूल, चिखली, पुणे) व डॉ. अश्विनी पानसरे (अभिनव पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, पुणे) यांची २८ मे २०२४ रोजी शैक्षणिक भेटीसाठी थायलंड येथील डॉक्टर कांचली पुनियन वरिष्ठ शिक्षक डायरेक्टर कार्यालय, शिक्षण मंत्रालय, थायलंड यांनी निवड केली.

एक्सलन्स इन सायन्स एज्युकेशन ब्यूरो ऑफिस ऑफ बेसिक एज्युकेशन कमिशन मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन थायलंड इथे डॉक्टर कांचली पुनियन व त्यांचे सहकारी यांच्यासोबत विविध विषयावर चर्चा करण्यात आली. प्रामुख्याने STEM एज्युकेशन आणि फ्युचर वर्क फोर्स याबाबत नवीन अभ्यास उपक्रम व त्याबाबत थायलंड येथील दिले जाणारे शिक्षण इन्स्पायरिंग सायन्स इन क्लासरूम ह्या प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पीपीटीच्या प्रेझेंटेशनद्वारे थायलंड एज्युकेशन सिस्टम समजून सांगण्यात आले. बँकॉक थायलंड ह्या भेटी अंतर्गत थायलंड व भारत देशातील मुलांचे शैक्षणिक व विकासात्मक बदल घडून आणण्यासाठी, एकमेकांशी संवाद व सहकार साधण्यास मदत होणार आहे.

या सर्व शैक्षणिक भेटीचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रिन्सिपल अविनाश कुलकर्णी यांचे बँकॉक थायलंड शैक्षणिक भेटीबाबत कौतुक करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व ‘रयत’चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे आदी उपस्थित होते.



# ३६ घंटे @ ५०

## दीड दिवसाचे थरार नाट्य









झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

हिंमत सिंह (सुनील दत्त), त्याचा भाऊ अजित सिंह (रणजीत) आणि या दोघांचा साथीदार दिलावर खान (डॅनी डेन्झोप्पा) हे खौपनाक लुटारु या दरोड्यात बँकेतील नोटा, दागिने बॅगेत भरतात आणि आता ते त्यांची साथीदार कामिनी (सोनिया साहनी) हिच्या गाडीत बसून पुणे शहराकडे पळणार तोच शस्त्रधारी पोलीस येतात. त्यांच्यात व या तीन दरोडेखोर यांच्यात जोरदार चकमक सुरू होते. त्यात कामिनी गाडी घेऊन पळ काढण्यात यशस्वी ठरते, पण हे तिघे पोलिसांवर प्रतिहल्ला करण्याच्या प्रयत्नात गाडीत बसू शकत नाही. लुटीचा पैसा व दागिने कामिनीच्या गाडीत असतात तर आता हे तिघे मिळेल ती गाडी पळवून पोलिसांना चकमा देतात. बराच काळ पोलीस या गाडीचा पाठलाग करतात, पण ते या लुटारुना पकडू शकत नाहीत.

...हे तीन खौपनाक नि विक्षिप्त लुटारु एका वृत्तपत्र संपादक अशोक रॉय (राजकुमार) यांच्या प्रशस्त घरात आश्रयासाठी घुसतात. अशोक रॉय हे आपली पत्नी दीपा रॉय (माला सिन्हा), मुलगी नैना रॉय (परवीन बाबी) आणि शालेय वयातील मुलगा (मा. शैलेश) राहत असतात. त्यांनी चुपचाप रहावे, आपल्या सूचना पाळाव्यात, कामिनीशी संपर्क होईपर्यंत आपण येथेच राहणार असे ते तिघे अशोक रॉयना सक्त ताकीद देऊन सांगतात, यातून जे थरारक नाट्य घडते तो चित्रपट म्हणजे, राज तिलक दिग्दर्शित छत्तीस घंटे हा थ्रीलर चित्रपट. मुंबईत हा चित्रपट २१ जून १९७४ रोजी प्रदर्शित झाला. मेन थिएटर अप्सरा होते. चित्रपटाला ५० वर्षे पूर्ण झालीदेखील, यानिमित्त हा फोकस. हा थरार काहिसा बोथट झाल्यानेच चित्रपटाला अगदीच साधारण यश प्राप्त झाले. दिग्दर्शकाचा प्रयत्न चांगला होता, पण पटकथेत फार टर्न आणि ट्विस्ट नव्हते. वा निर्माण करता आले नाहीत. निर्माता व दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांच्या बी. आर. फिल्म यांच्या स्टोरी डिपार्टमेंटने या चित्रपटाचे लेखन केले (पूर्वीच्या अनेक चित्रपटाच्या गोष्टी अशाच जन्माला आणल्या जात. या स्टोरी डिपार्टमेंटमध्ये किती जण कामाला असत, ते टाईपरायटरवर काम करीत काय हे शोध घेऊनही कधीच समजले नाही.) संवाद अख्तर उल इमान यांचे आहेत.

या चित्रपटाची निर्मिती बी. आर. फिल्मच्याच बॅनरखालील. (सुरुवातीस श्रेयनामावलीत तसा उल्लेख आहे). राज तिलक यांचा दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट. ते बी. आर. चोप्रा यांच्याकडे दास्तान (१९७२), धुंद (१९७३), यश चोप्रा यांच्याकडे इत्तेफाक (१९६९) आणि आदमी और इन्सान (१९७०) या चित्रपटांच्या वेळेस सहाय्यक दिग्दर्शक होते. हे सर्व बी. आर. फिल्म या बॅनर निर्मित चित्रपट. हे तसेच बी. आर. फिल्मचे बी. आर. चोप्रा दिग्दर्शित 'कानून' (१९६०), 'हमराज' (१९६७) हे रहस्यरंजक चित्रपट. या चित्रपटातील कानून व इत्तेफाक यात एकही गाणे नाही हे विशेषच आणि त्या काळात तर आश्चर्यचकित करणारे. गीत संगीत नृत्य म्हणजे चित्रपटाचा ऑक्सिजन असा तो काळ.

३६ घंटे या नावातच वेगळेपण आहे. आणि स्टार कास्टदेखील तगडी. सुनील दत्त खलनायकच्या भूमिकेत हे तर मुहूर्तापासूनच गाजत होते. (या चित्रपटाच्या कलाकारांची निवड होण्याच्या दिवसात सुनील दत्तचा काहीसा पडता काळ होता. कमबॅकसाठी तो धडपडत होता. अभिनेत्री साधना हिने दिग्दर्शित केलेल्या 'गीता मेरा नाम'मध्ये साधनाची दुहेरी भूमिका असतानाच फिरोझ खान नायक तर सुनील दत्त खलनायक होता.) डॅनी व रणजीत हे त्या काळातील पडद्यावरचे हुकमी बदमाश. त्यांच्यासोबत सुनील दत्त ही आघाडी वा समीकरण




काही वेगळेच. तिघांचे गेटअप भयावह आणि डरावने. रणजीत या संधीने विलक्षण खुश होता, असे त्यानेच मला अलिकडेच त्याची इट्स मज्जा या डिजिटल चॅनेलसाठी त्याच्याच जुहूच्या बंगल्यावर मुलाखत शूट केली तेव्हा त्याने म्हटले. आपले खरे नाव गोपाल बेदी. सुनील दत्तने रेश्मा और शेरा या चित्रपटातून रुपेरी पदार्पणची संधी दिली तेव्हा त्यांनीच रणजीत केले हे त्याने प्रचंड उमाळ्याने सांगितले (यू ट्यूबवर ही मुलाखत पाहता येईल) आणि आता पुन्हा सुनील दत्तसोबत खलपुरुष साकारायची संधी, याचा आनंद काही वेगळाच.

३६ घंटेचा पूर्वप्रसिद्धीचा जास्त फोकस याच तिघांवर राहिल्याने तेच या चित्रपटाच्या कथेचे नायक वाटू लागले. बनी रुबैन यांनी चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीचे तर वसंत साठे यांनी चित्रपटाच्या प्रमोशनचे काम पाहिले. (वसंत साठे यांनीच राज कपूरच्या बॉबीचे लेखन केले. अनेक चित्रपटांच्या पूर्वप्रसिद्धीचे काम ते अतिशय कल्पकतेने, हुशारीने व हौसेने करीत. एक गोष्ट आवर्जून सांगायलाच हवी, हे वसंत साठे आणि त्या काळातील काँग्रेस नेते केंद्रीय मंत्री वसंत साठे या दोन भिन्न व्यक्ती होत्या. त्यांच्यात फक्त नामसाम्य होते इतकेच. सोशल मीडियात तर हा फरक आवर्जून सांगायलाच हवा. वसंत साठे आणि एम. बी. सामंत यांच्या बॉम्बे पब्लिसिटी सर्विस या विश्वासार्ह संस्थेच्या वतीने अनेक चित्रपटांच्या पूर्वप्रसिद्धी व प्रमोशनचे काम करण्यात येई हे मी स्वतः अनुभवलंय.)

आज मी ३६ घंटे या चित्रपटाचा विचार करतो तेव्हा माझ्या मनात प्रश्न येतो, यश चोप्रांचा इत्तेफाक सुपरहिट ठरला म्हणून बी. आर. चोप्रा यांनी त्यासारखीच एकाच फ्लॅटमध्ये घडणारा थरार म्हणून ३६ घंटेची कथाकल्पना पडद्यावर आणली नाही ना? शक्यता नाकारता येत नाही आणि चोप्रांचे हुकमी कलाकार राजकुमार, सुनील दत्त व माला सिन्हा यांनी चोप्रांसाठीच राज तिलकला होकार दिला असावा. ते सहजी (विशेषत: लहरी राजकुमार) सहजी चित्रपट स्वीकारणारे नव्हतेच. इत्तेफाकचं नाट्य आणि रहस्यरंजकता अखेरपर्यंत खुर्चीला खिळवून ठेवणारी. क्लायमॅक्सला जोर का धक्का धीरेसे लगे असं खरा खुनी समजल्यावर होतं. राजेश खन्नाच्या बेहतरीन अदाकीरीपैकी हा एक चित्रपट. नंदा (साधनाने नकार दिल्यावर नंदाकडे हा चित्रपट आला), बिंदू, इफ्तेखार, सुजीतकुमार यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचे शूटिंग परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत एका सेटवर झाले होते. ३६ घंटेमध्ये अशी नाट्यमयता वा पकड नव्हती. नैना रॉयला तिचा प्रियकर विजय (विजय अरोरा) भेटायला येतो त्यात थ्रिल निर्माण करता आले नाही. राजकुमार असल्याने डायलॉगबाजीवर बराच भर होता. पण जोरदार संवादफेक म्हणजे चित्रपट पुढे सरकतो असे नव्हे. सुनील दत्त, रणजित व डॅनी या तिघांनी खौपनाक खलनायकीत जबरा रंग भरला. डॅनीने बी. आर. चोप्रा दिग्दर्शित धुंद (१९७३) मधील नकारात्मक व्यक्तीरेखेत आपला जबरदस्त ठसा उमटवून सगळ्यांचेच लक्ष वेधून घेतले होते.

साहिर यांच्या गीतांना सपन चक्रवर्ती यांचे संगीत. सुरुवातीस चित्रपटात असलेल्या चार गाण्यातील दोन रोमॅन्टीक गाणी अडथळा वाटतो म्हणून आठवडाभरात कापण्यात आली. अशोक रॉय आपल्या कुटुंबासह सकाळी देवापुढे भजन गातात हे गाणे श्रवणीय. तीन लोक घर राज तिहारा चार हे ते भजन.

चित्रपटात इफ्तेखार (विजयचे पिता), उर्मिला भट्ट (विजयची आई), रमेश देव (इन्स्पेक्टर वाडेकर) यांसह देवेन वर्मा इत्यादींच्या भूमिका. या चित्रपटाची मूळ कल्पना जोसेफ हेस यांच्या १९५४ या कादंबरीत होती, त्यावरुन द डेस्परेट अवर्स (१९५६) हा अमेरिकन चित्रपट निर्माण झाला. त्यावरुन हिंदी चित्रपट करताना मूळ स्पार्क हरवला. त्यातला थरार बोथट झाला. कदाचित त्या काळातील प्रेक्षकांना तीन लुटारुंनी एका कुटुंबाला ओलीस ठेवणे आवडेल न आवडेल या समजदारीत दिग्दर्शक सापडला असावा. रवि चोप्रा या चित्रपटाच्या वेळेस राज तिलककडे सहाय्यक दिग्दर्शक होता. या चित्रपटाने साधारण स्वरुपाचे यश संपादले. काही वर्षांनी मॅटीनी शोला या चित्रपटाला रिस्पॉन्स मिळत राहिला याचं कारण, अशाच थ्रिल चित्रपटांचा मॅटीनी शोला हुकमी प्रेक्षकवर्ग होता.

दिग्दर्शक राज तिलकनी त्यानंतर मुक्ती (शशी कपूर, संजीवकुमार, विद्या सिन्हा), 'चेहरे पे चेहरा' (संजीवकुमार, रेखा) इत्यादी चित्रपटांचे दिग्दर्शन केले. पण आपली ओळख निर्माण करण्यात त्याला यश प्राप्त झाले नाही....

३६ घंटे हीच काय ती त्याची ओळख नि आठवण.

# नाटककार, संगीत दिग्दर्शक वसंत देसाई



भारतीय कीर्तीचे सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक, नाटककार वसंत कृष्णाजी देसाई यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म २७ डिसेंबर १९०४ रोजी सोनवडे (सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) येथे झाला. त्यांचे वडील कृष्णाजी व आई मुक्ताबाई. मुक्ताबाई या आबा भास्कर परुळेकर या प्रसिद्ध कीर्तनकारांच्या कन्या. त्यामुळे लहानपणापासून वसंत यांच्या कानावर भजन, कीर्तन, दशावतारी संगीत आले व त्याची गोडीही लागली. त्यांचे शालेय शिक्षण गावीच झाले.

सर्कशीत जावे असे वसंत देसाई यांना लहानपणी वाटत होते. म्हणून ते कोकणातून कोल्हापुरास त्यांचे काका नरहरी यांच्याकडे आले (१९२९), परंतु सर्कशीत न जाता प्रभात फिल्म कंपनीत गेले. मूकपटांतून किरकोळ भूमिकाही त्यांनी केल्या. १९३०मध्ये प्रभातच्या खूनी खंजर या मूकपटात त्यांना छोटी भूमिका मिळाली. त्याच सुमारास प्रभात फिल्म कंपनीच्या अयोध्येचा राजा (१९३१) या पहिल्या बोलपटात त्यांनी संगीत दिग्दर्शक गोविंदराव टेंबे यांचे सहाय्यक म्हणून काम केले, तर १९३४ साली प्रभात फिल्म कंपनीचे कोल्हापुराहून पुण्यास स्थलांतर झाल्यावर वसंतरावांनी केशवराव भोळे आणि मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांच्यासारख्या संगीत-अभ्यासकांबरोबर सहाय्यक म्हणून काम केले. त्यांच्या सहवासात राहून त्यांनी गाण्यातील स्वर, तान, मुरकी इ. संगीत-विशेष संपादन केले व रसानुकूल भावदर्शन आपल्या गाण्यात आणण्याचे कसब दाखविले तसेच स्वतंत्र स्वररचनेचे तंत्रही त्यांनी हाताळले.

कोल्हापुरातील वास्तव्यात वसंतराव गायन समाज देवल क्लब या संगीत संस्थेत जात असत. तेथे त्यांना शास्त्रीय संगीतातील दिग्गज उस्ताद अलाउद्दीनखाँ, उस्ताद अब्दुलकरीमखाँ, उस्ताद मंजीखाँ आणि रामकृष्णबुवा वझे यांचा सहवास लाभला. याचाही परिणाम त्यांची शास्त्रीय संगीतातील रूची वाढण्यात झाला. 'प्रभात'च्या संत ज्ञानेश्वर आणि संत सखू या गाजलेल्या चित्रपटांच्या काही चाली व बरेचसे पार्श्वसंगीत वसंत देसाई यांचे आहे. त्याच वेळी त्यांनी प्रभात फिल्म कंपनीच्या चित्रपटांसाठी पार्श्वगायनही केले व चित्रपटांतून भूमिकाही ते करीत होते. प्रभातच्या धर्मात्मामधील राणू महार आणि संत ज्ञानेश्वरमधील भैरू गाडीवान या त्यांच्या विशेष लक्षात राहण्यासारख्या भूमिका होत. हलक्याफुलक्या संगीतापेक्षा रागदारी संगीतामध्ये त्यांना विशेष गोडी असल्यामुळे प्रभात फिल्म कंपनीत असतानाच त्यांनी इनायत खाँसाहेब यांच्याकडे शास्त्रोक्त संगीताची साधना केली तसेच ख्यातनाम गवयांच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका वारंवार ऐकून व विविध घराण्यांच्या गायकांच्या बैठकांना जाऊन संगीतातील मर्म समजावून घेण्याचेही त्यांनी बरेच प्रयत्न केले. त्यांच्या गाण्याच्या बैठकीही त्या काळात होत असत. १९३९मध्ये ते प्रभात फिल्म कंपनी सोडून मुंबईला आले.


व्ही. शांताराम यांच्या राजकमल कला मंदिराच्या शकुंतला (१९४३) चित्रपटापासून खऱ्या अर्थाने त्यांना स्वतंत्र संगीत दिग्दर्शनाची संधी मिळाली. त्यानंतर ३२ वर्षे त्यांनी अनेक मराठी व हिंदी चित्रपट, नाट्यकृती, बालगीते, समरगीते यांना उत्कृष्ट संगीत दिले. दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या बहुतेक चित्रपटांना देसाईंनी संगीत दिले आहे. त्यांनी संगीत दिलेली सुंदरा मनामध्ये भरली (लोकशाहीर रामजोशी, १९४७), घनश्याम सुंदरा, सांगा मुकुंद कुणी हा पाहिला (अमर भूपाळी, १९५१), छडी लागे छमछम, भरजरी गं पितांबर (श्यामची आई, १९५३) इत्यादी मराठी आणि झनक झनक पायल बाजे, जो तुम तोडो पिया (झनक झनक पायल बाजे, १९५५), ऐ मालिक तेरे बंदे हम, सैया झूठो का बडा सरताज निकला (दो आँखे बारह हाथ, १९५७), तेरे सूर और मेरे गीत, अखियाँ भूल गयीं है सोना (गूँज उठी शहनाई, १९५९), जीवन से लंबे है बंधू, रेल गाडी (आशीर्वाद, १९६८) व बोले रे पपीहरा, हमको मन की शक्ती देना (गुड्डी, १९७१) इत्यादी हिंदी गाणी विशेष गाजली. अमर भूपाळी या चित्रपटाच्या बंगाली रूपांतरातही संगीत वसंत देसाई यांचेच आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनाप्रसंगी वसंतरावांनी चाल दिलेली 'घन:श्याम सुंदरा' ही भूपाळी म्हटली गेली. 'ऐ मालिक तेरे बंदे हम' या त्यांनी स्वरबद्ध केलेल्या गीताने पाकिस्तानात आकाशवाणीवर व शाळांतून प्रार्थनेचा दर्जा संपादन केला. त्यांनी सुमारे ४५ हिंदी व २० मराठी चित्रपटांना संगीत दिले. या संगीतात रागदारीबरोबरच महाराष्ट्राच्या लोकगीतांचाही आविष्कार त्यांनी घडविला होता. त्यामुळेच भारतातील सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत दिग्दर्शक म्हणून वसंत देसाई यांचा लौकिक झाला. त्यांच्या संगीताने आपले स्वत:चे वेगळेपण टिकवून ठेवले होते. त्यांच्या गाण्यात त्यांनी शास्त्रीय संगीताचा खुबीने वापर केला. गीतकार गुलजार यांनी निर्मिती केलेल्या अचानक (१९७४) या चित्रपटास देसाईंनी पार्श्वसंगीत दिले होते. या चित्रपटात गाणी नव्हती. वसंत देसाई यांच्या स्वरसाजाने समृद्ध झालेल्या पंडितराज जगन्नाथ या नाटकाने मराठी रंगभूमीची संगीतपरंपरा पुन्हा सुरू झाली. या नाटकातील जय गंगे भागिरथी आणि नयन तुझे जादुगार ही गाणी खूप गाजली. याशिवायही जय जय गौरीशंकर, देव दीनाघरी धावला, देह देवाचे मंदिर, शाबास बिरबल इत्यादी नाटकांना त्यांनी संगीत दिले.

१९६२मधील चीनच्या आक्रमणाच्या वेळी देसाई यांनी स्वरबद्ध केलेले 'जिंकू किंवा मरू' हे ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेले समरगीत विशेष लोकप्रिय ठरले. ते महाराष्ट्र राज्य शासनाचेही संगीत दिग्दर्शक होते. त्यांनी संगीत दिलेल्या अनेक चित्रपटांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले आहेत. १९७१ साली त्यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने गौरविले; तर १९७३-७४मध्ये त्यांना मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला होता. राज्यपालांनी त्यांची नियुक्ती १९७५मध्ये विधान परिषदेवर केली होती.

साधा पोषाख, निगर्वी स्वभाव व हसरा चेहरा हे त्यांचे व्यक्तिमत्त्वविशेष. ते अविवाहित होते. अशा या गुणी संगीततज्ज्ञाला मुंबई येथील पेडर रोडवरील त्यांच्या निवासस्थानाच्या इमारतीत वयाच्या एकसष्टाव्या वर्षी लिफ्टमध्ये २३ जून १९९४ रोजी अपघाती मरण आले. **(साभार : मराठी विश्वकोश)**

# भारतीय जनसंघाचे संस्थापक श्यामा प्रसाद मुखर्जी



एक थोर राष्ट्रीय नेते, भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष व शिक्षणतज्ज्ञ अशी श्यामा प्रसाद मुखर्जी यांची ओळख राहिली आहे. आज त्यांचा पुण्यस्मरण दिन. त्यांचा जन्म ६ जुलै १९०१ जून रोजी कलकत्त्यात (आताचे कोलकाता) प्रसिद्ध मुखर्जी घराण्यात झाला. त्यांचे वडील आशुतोष मुखर्जी विख्यात न्यायाधीश आणि पुढे कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू, तर त्यांच्या आईचे नाव जोगमायादेवी. हुशार विद्यार्थी म्हणून श्यामा प्रसाद यांनी कीर्ती मिळविली आणि प्रत्येक परीक्षेत पहिल्या वर्गात पहिला क्रमांक मिळविण्याचा त्यांनी विक्रमच केला.

श्यामा प्रसाद कलकत्ता विद्यापीठातून बीए झाले (१९२१). विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह सुधादेवी या मुलीशी झाला (१९२२). त्यांना दोन मुले व दोन मुली झाल्या. लग्नानंतर त्यांच्या वडिलांचे निधन पुढच्याच वर्षी झाले. तेव्हा त्यांची कलकत्ता विद्यापीठाच्या सीनेटवर निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी बीएल (१९२४) ही पदवी घेऊन इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास केला व ते बॅरिस्टर झाले (१९२७). लंडनहून परत आल्यावर त्यांनी वकिली सुरू केली. ते बंगाल कायदेमंडळावर निवडून आले (१९२९), पण वर्षभराने गांधीजींच्या देशव्यापी कायदेभंग आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी त्यांनी कायदेमंडळाचा राजीनामा दिला. या वेळी काँग्रेसच्या एकूण धोरणाविषयी ते नाराज होते. परिणामतः ते हिंदू महासभेकडे वळले.

पुढे श्यामा प्रसाद कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले (१९३४). त्याच वर्षी त्यांच्या पत्नी सुधादेवी निवर्तल्या. त्यानंतर अखेरपर्यंत त्यांनी दुसरा विवाह केला नाही. हिंदू महासभेतर्फे ते १९३७मध्ये बंगालच्या कायदेमंडळावर पुन्हा निवडून आले. मुस्लिम लीगच्या १९४०च्या लाहोर ठरावानंतर त्यांनी फाळणीविरुद्ध देशभर प्रचार केला. त्या आधी काही काळ ते हिंदू महासभेचे हंगामी अध्यक्षही होते. लीग मंत्रिमंडळाच्या पराभवानंतर ते बंगालच्या फझलुल हक मंत्रिमंडळात सामील झाले, पण भारत छोडो आंदोलनाच्या वेळी त्यांनी गांधीजी व इतर काँग्रेस नेत्यांची सुटका आणि संभाव्य जपानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या स्थापनेची मागणी केली. या प्रश्नांवर तड लावण्यासाठी नंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

१९४३च्या बंगालच्या भीषण दुष्काळात श्यामा प्रसादांनी दुष्काळ निवारण्यासाठी खूप कष्ट घेतले. १९४७च्या सुरुवातीस देशाची फाळणी होणार असे दिसू लागल्यावर त्यांनी बंगालच्याही फाळणीचा आग्रह धरला. भारत स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरु यांच्या पहिल्या केंद्रीय मंत्रिमंडळात ते उद्योग आणि पुरवठामंत्री झाले. त्या आधीच हिंदू महासभेमध्ये अहिंदूनांही प्रवेश द्यावा या मुद्यावर त्यांनी त्या पक्षाचा राजीनामा दिला होता. मंत्री म्हणून त्यांनी फार अल्प काळ काम केले. नेहरू-लिकायत अलीखान कराराच्या निषेधार्थ त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला (१९५०). तथापि, त्यांच्या कारकीर्दीत चित्तरंजन चलनशील यंत्र कारखाना व सिंद्री खत कारखाना हे दोन भव्य प्रकल्प त्यांच्या प्रयत्नांनी सुरू होऊन भारताच्या औद्योगिक विकासात मोलाची भर पडली.

काँग्रेसला शह देण्यासाठी श्यामा प्रसाद यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली (१९५१). पक्षात पहिल्यापासूनच सर्वांना प्रवेश खुला ठेवण्यात आला होता. १९५२च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ते जनसंघातर्फे लोकसभेवर निवडून आले. संसदेत त्यांनी विरोधी पक्षांची एक राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केली. त्याचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. ते महाबोधी सोसायटीचे अध्यक्ष झाले आणि प्राचीन अवशेष घेऊन त्यांनी ब्रह्मदेश व कंबोडिया या देशांनी भेटी दिल्या. त्यानंतर त्यांनी जम्मू व काश्मीरच्या संपूर्ण विलीनीकरणासाठी अभियान सुरू केले. या आंदोलनानिमित्त प्रत्यक्ष काश्मीरमध्ये जाऊन प्रचार करण्याचा त्यांनी निश्चय केला. जम्मू-काश्मीरचे तत्कालीन मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांच्या शासनाने त्यांच्या राज्यप्रवेशावर बंदी घातली. बंदी मोडून जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश केल्यावर त्यांना अटक झाली. तुरुंगवासातच त्यांचा २३ जून १९५३ रोजी मृत्यू झाला. **(साभार : विकासपिडीया)**

# ‘कोकण पदवीधर मतदार संघातून निरंजन डावखरे पुन्हा विजयी होणार’

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण पदवीधर मतदार संघातून मागील वेळीदेखील विजयी झालेले निरंजन डावखरे या वेळी मोठ्या फरकाने विजयी होतील, असा आत्मविश्वास शिवसेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी व्यक्त केला आहे.



मागील काळात निरंजन डावखरे यांनी आपल्या कामाचा ठसा चांगल्या प्रकारे उमटवला असून पदविधरांचे अनेक प्रश्न मार्गी लावण्यात व मतदार संघात अधिकचा निधी आणण्यात आमदार निरंजन डावखरे यशस्वी झाले असून पदवीधर मतदारांच्या माध्यमातून निवडून येणारा उमेदवार हा पदवीधरच असला पाहीजे, पदवीधरांचे प्रश्न मार्गी लावणारा सय्यमी, दुरदृष्टी असलेला, तरुण उमेदवार पदवीधर मतदारांना मिळाला असून पदवीधर मतदार या वेळीदेखील निरंजन डावखरे यांच्या मागे ठाम राहतील.

कोकणातील शिवसेना, भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी हे तीनच पक्ष प्रामुख्याने आहेत आणि या वेळी हे तीनही पक्ष एकत्र महायुतीमध्ये सामील आहे त्यामुळेच कोकण पदवीधर निवडणूक ही एकतर्फी महायुतीच्या माध्यमातून विजयी संपादन करेल. मागील दोन वर्षात महायुतीच्या माध्यमातून प्रामुख्याने शिवसेनेच्या माध्यमातून अनेक नवीन मतदारांची नोंदणी करण्यात आली असून त्याचा फायदा नक्कीच महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे यांच्या विजयात होईल असा विश्वास शिवसेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांना व्यक्त केला आहे.

विरोधी पक्षाकडून सध्या कोणतीच विकासकामे झाल्याचे दिसत नाहीत ना पदवीधर मतदारांसाठी झटताना कोणी चेहरा दिसत नाही. विरोधकांकडे निवडणूक लढविण्यासाठी ठोस मुद्दे नाहीत. आघाडीच्या नेत्यांमध्ये ताळमेळ नाही. उमेदवार निवडीमध्ये एकवाक्यता दिसत नाही. त्यामुळे निरोधकांना डावखरे यांना काही विचारण्याचे नैतिक अधिकारी नाही अशी टीका करताना महायुतीची सुरूवात लोकसभा निवडणूकीत सुनील तटकरे यांच्या विजयाने कोकणात झाला असून विजयाची हीच मुहूर्तमेढ कोकण पदवीधर मतदार संघाचे महायुतीचे लोकप्रिय उमेदवार निरंजन डावखरे यांच्या विजयाने अभाधित राहील, असा विश्वास शिवसेना दक्षिण रायगडचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी व्यक्त केला आहे.

# दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील केंबुर्ली गावाजवळ मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या मोटरसायकल अपघातात तालुक्यातील दासगाव येथील



एक तरुण जागीच ठार झाला. महामार्गावरील वळणे कायम असल्याने महामार्गावरील अपघात मालिका आजही कायम असल्याचे दिसून येत आहे.

संदेश ठकसेन निवाते (वय ३०, रा.दासगाव) असे मृत तरुणाचे नाव असून तो महाड औद्योगिक वसाहतीमधील इफ्का केमिकल या कंपनीत कामाला जात होता. भर पावसामध्ये केंबूर्ली गावाजवळील वळणावर तो ज्या दुचाकीवरून जात होता ती दुचाकी घसरली. रस्त्याच्या मध्यवर्ती भागात असलेल्या दुभाजकावर जोरात आदळली. हा अपघात सायंकाळी सातच्या सुमारास घडला. अपघातामध्ये या तरुणाच्या पायाला तसेच डोक्याला गंभीर इजा झाली. यामध्ये त्याचा जागेचा मृत्यू झाला. या तरुणाच्या मृत्यूनंतर गावांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यानंतर महाड ग्रामीण रुग्णालयात शवाविच्छेदन करून त्याचे पार्थिव कुटुंबियांच्या ताब्यात दिले.

# कर्जतमध्ये सहा मतदान केंद्र; ३८७५ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूकसाठी कर्जत तालुक्याची निवडणूक यंत्रणा तयार झाली आहे. कर्जत तालुक्यात ३८७५ पदवीधर मतदार असून त्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा. यासाठी सहा मतदान केंद्र कर्जत तालुक्यात बनविण्यात आली आहेत. कोकण पदवीधर मतदारसंघात १३ उमेदवार आपले भविष्य अजमावत असून २६ जून रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होणार आहे.

मतदारांना मतदान करता यावे कर्जत शहरातील प्रशासकीय भवन येथे चार मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. तर दोन मतदान केंद्र नेरळ गावात असणार आहेत. नेरळ गावात तलाठी कार्यालयाच्या मागे असलेल्या जिल्हा परिषद कन्या शाळा येथे दोन मतदान केंद्र असणार आहेत. सकाळी सात ते सायंकाळी साह वाजेपर्यंत मतदानाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघात एकूण १३ उमेदवार असून त्या मतदान हे पसंती क्रमानुसार करता येणार आहे. एक मतदार सर्व उमेदवारांनाआपला पसंतीक्रम देऊ शकतो. त्यासाठी आपल्या पसंतीच्या उमेदवार यांच्या नावापुढे असलेल्या चौकटीत एक, दोन, तीन असे नंबर टाकू शकतो. त्यासाठी मतदान केंदार्त विशेष प्रकारचा पेनदेखील ठेवण्यात येत असतो. त्याच पेनच्या साहाय्याने मतपत्रिकेवर मतदाराला पसंती क्रमानुसार मतदान नोंदविता येते.

कर्जत शहर आणि परिसरातील ग्रामपंचायत हद्दीमधील पदवीधर मतदान यांच्यासाठी कर्जत प्रशासकीय भवन येथे मतदान केंद्र असणार आहेत तर नेरळ ग्रामपंचायत तसेच माथेरान शहर आणि आजुबाजुंच्या ग्रामपंचायतीमधील मतदाराचे मतदान नेरळ येथील केंद्रावर असणार आहे.

# सिद्धेश पवार बनला खांदाडमधील पहिला डॉक्टर

**माणगाव : प्रतिनिधी**

नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांचे कनिष्ठ सुपुत्र कुमार सिद्धेश ज्ञानदेव पवार हा रशिया येथील युनिव्हर्सिटीमध्ये एमबीबीएस चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन डॉक्टर झाला आहे. सिद्धेश याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्था माणगाव यांनी सिद्धेश याचे विशेष अभिनंदन केले आहे. माणगाव शहरातील खांदाड गावातील डॉ. सिद्धेश पवार हा एमबीबीएस होणारा पहिलाच डॉक्टर असून कुणबी समाजातील परदेशातील डॉक्टर ही उच्चतम पदवी मिळविणारा पहिलाच डॉक्टर झाला आहे. याचा खांदाड आणि माणगाव तालुक्यातील कुणबी समाजाला सार्थ अभिमान वाटत आहे. आपल्या यशाचे सारे श्रेय



आई, वडील आणि शिक्षक यांना देत आहे असे डॉ. सिद्धेशने सांगितले आहे. या यशाबद्दल बद्दल सिद्धेशचे मनस्वी अभिनंदन आणि कौतुक करून त्याला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



**माणगाव : टपौर्णिमेनिमित्त येथील महिलांनी वडाच्या झाडाजवळ मनोभावे प्रार्थना केली. (छाया : सलीम शेख)**

# थेरोंडा समुद्रकिनारचा ‘तो’ मृतदेह बेपत्ता मच्छीमाराचा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थेरोंडा बाजारपाडा समुद्रकिनारी वाहून आलेला एक अनोळखी पुरूषाचा मृतदेह सापडला असून तो मृतदेह मालवण येथील तोंडवली खाडीत बुडून बेपत्ता झालेला मच्छीमाराचा असल्याचे नातेवाईकांच्या ओळख परेडमध्ये निष्पन्न झाले आहे.

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत थेरोड बाजारपाडा समुद्रकिनारी २० जुन रोजी सायकांळी साडेसहा वाजता पुरूष जातीचे सुजलेला मृतदेह वाहत आल्याची खबर रेवदंडा येथील पोलीस पाटील स्वप्निल तांबडकर यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे दिली. हा मृतदेहाची उंची पाच फुट तसेच अंगावर चॉकलेटी हाफपॅट, व अंगात पिवळे टिशर्ट असून वय अंदाजे ४० वर्षे असावे, असा कयास लावण्यात आला. याबाबत पुढील तपास सुरू आहे.

मालवण तालुक्यातील तोंडवली-तलाशील येथील किशोर महादेव चोढणेकर (वय ५५) त्याचा मुलगा लावण्य चोढणेकर व धोंडीराम परब हे तिघे ८ जुन २०२४ रोजी रात्री ९चे सुमारास तोंडवली खाडीत मच्छीमारी करीत असताना जाळी वार्याने समुद्रात ओढली जाउन होडी पलटी झाली. यामध्ये किशोर महादेव चोढणेकर (वय ५५) बेपत्ता झाल्याची माहिती भुषण महादेव चोडणेकर (वय ३८) यांनी १० जुन २०२४ रोजी मालवण पोलीस ठाणे येथे दिली होती. याबाबतचा तपास मालवण पोलीस ठाण्याचे हेडकॉंस्टेबल ८९२ पेडणेकर हे पोलीस निरिक्षक प्रवीण कोल्हे यांचे मार्गदर्शनाखाली करत होते.

रेवदंडा पोलीस ठाणे येथे सापडलेला अनोळखी व्यक्तीचे टिशर्ट घाटकोपर भटवाडी साईदर्शन असा उल्लेख असल्याने हा फोटो घाटकोपरमध्ये व्हायरल झाला त्यामुळे तपासकामी मदत झाली व मृतदेहाची ओळख पटली. त्यानंतर हा मृतदेह किशोर चोढणेकर यांच्या असल्याचे नातेवाईकांनी केलेल्या ओळख परेड मध्ये निष्पन्न झाले, अशी माहिती रेवदंडा पोलीस ठाणे येथून प्राप्त झाली.

# रोह्यात समाधानकारक पाऊस

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात गेली दोन पावसाने चांगली सूरुवात केली आहे. तालुक्यात समाधानकारक पाऊस पडत आहे.

रोहा शहरासह ग्रामीण भागात चांगला पाऊस पडत असल्याने नागरीकातुन समाधान व्यक्त केले जात आहे. गर्मीने हैराण झालेल्या नागरीकांना पडत असलेल्या पावसामुळे दिलासा मिळाला आहे.हवेत गारवा निर्माण झाल्याने उकड्याने हैराण असलेल्या नागरिक गारव्याने सुखावले आहेत.

पावसाने सुरुवात केल्यानंतर ग्रामीण भागात शेतकऱ्यांनी शेतीच्या कामाची लगबग सुरू केली आहे. ठिकठिकाणी पेरणीपूर्वी व पेरणीनंतर च्या कामाला वेग मिळाला आहे.

पावसामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या व नागरीकांच्या छत्र्या, रेणकोट घालुन विद्यार्थी, नागरीक व कामगार बाहेर पडताना दिसत आहे. पावसाने शुक्रवारी सकाळी विजेच्या कडकडासह सुरुवात केली आहे तर दुसरीकडे अधुन मधुन विजेचा लपंडाव चालु असल्याचे दिसून आले आहे.



# मुरूडच्या सर.एस.ए. हायस्कूलमध्ये योगा दिन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड सर. एस. ए.हायस्कुलमध्ये जागतिक योगा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुरूड नगर परिषदेचे पाणीपुरवठा माजी सभापती तथा सर एस.ए.हायस्कूल ज्युनियर कॉलेजचे संचालक- पांडुरंग आरेकर यांनी योगा केल्यामुळे शरीर तंदुरुस्त व निरोगी राहते हीच निरोगी जीवनाची खरी गुरूकिल्ली आहे, असे प्रतिपादन केले.

या वेळी पर्यवेक्षक समीर माळी, भास्कर मोरे, तुषार दिवेकर मिलींद खामकर, राहूल वर्तक बालाजी घुगे, महेंद्र घाटवळ महेंद्र पाटील, शिल्पा मसाल अस्मिता गुरव, सीमा ताबडकर, मार्निंग स्टारच्या मुख्याध्यापिका नाईक मसाल म्हात्रे आदी शिक्षक उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक सरोज राणे म्हणाले की, माणसाचे शरीर तंदुरुस्त व निरोगी राहायचे असेल तर दररोज योगा व व्यायाम करणे गरजेचे आहे. सर्व शिक्षकांनीसुद्धा योगा करून जागतिक योगा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



# कर्जतमध्ये शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात शिवकालीन आठ गडकिल्ले आहेत. त्या सर्व ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा तिथी प्रमाणे साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शिव व्याख्यान व पोवड्यांनी कर्जतकर मंत्रमुग्ध झाले.



तालुक्यात आठ गड असून ते सर्व गड शिवकालीन आहेत. त्या ढाक भैरी, कोथळीगड, पदरगड, सोंडाई, विकटगड, सोनगीरी, तुंगी, भिवगड आदी आठ किल्ल्यांवर ३५० स्वराज्य शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. प्रती पंढरपूर येथे त्यासाठी एका कार्यक्रमाचे आयोजन ३५० स्वराज्य शिवराज्याभिषेक सोहळा समितीने केले होते. राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त मूर्ती पूजन, दुग्धाभिषेक, शिव आरती तसेच शिवप्रेम मंत्र, शिव प्रतिज्ञा, धेय्य मंत्र सादर करण्यात आले.

कर्जतमधील श्री कपालेश्वर मंदिरामध्ये सायंकाळी शिव व्याख्यान व शिवपोवाड्यांचे आयोजन करण्यात आले होते. समितीचे अध्यक्ष महेंद्र भोईर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सचिव विकास चित्ते यांनी प्रास्ताविकात या उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळे उपलब्ध करून देणाऱ्या संदीप तथा पप्पू गुरव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सायली भोसले यांनी शिवव्याख्यान दिले तर शिवपोवड्यांचे सादरीकरण शाहीर गणेश ताम्हाणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रेमनाथ गोसावी यांनी केले.

या वेळी जनार्दन परांजपे, संदीप गुरव, अॅड. योगेश देशमुख, प्रमोद भोसले, समाधान पाटील, संतोष वैद्य, राजाभाऊ कोठारी, पद्माकर गांगल, अभिजित मराठे, सदानंद जोशी, महेंद्र कांबळे, योगेश भरकले, शैलेश सातपुते, अमित क्षीरसागर, दिनेश कडू, अमोल भोपतराव आदी उपस्थित होते.

# भारतीय विद्यासंकुलनामध्ये आंतराष्ट्रीय योग दिन उत्साहात

नागोठणे : बातमीदार

नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या विद्यासंकुलनामध्ये शुक्रवारी (दि. २१) आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त पतंजली योगपीठ तत्त्ववधान मधील योग प्रमुख मीना अग्रवाल व संजय सेनी यांच्या मार्गदर्शनाखाली योग महोत्सव साजरा करण्यात आला.



आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून योग महोत्सवाचे प्रमुख अतिथी मिना अग्रवाल व त्यांचे सहकारी संजय सेनी यांनी प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करून प्रथमता विध्यार्थ्यांना कपालभाती प्राणायम, शीतली प्राणायम भ्रामरी प्राणायम ध्यान, नाडी शोधन प्राणायम यांचे प्रात्यक्षिक करून प्राणायमचे महत्त्व पटवून दिले तसेच सूर्यनमस्कार व वेगवेगळ्या आसनांचे प्रात्यक्षिक करून उपस्थित भारतीय विद्या संकुलनाचे कर्मचारी व विद्यार्थी यांच्याकडून करवून घेतले.

या कार्यक्रमावेळी श्रीमती शांताबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजच्या डॉ. रेश्मा मढवी, एस एस ओ एस पी डिप्लोमा कॉलेजचे रजिस्ट्रार प्रा. वैभव नांदगावकर, प्राचार्य विशाल पाटील, तसेच एस डी परमार इंग्लिश मिडीयम स्कुलच्या प्राचार्या अमृता गायकवाड आदींसह शिक्षक व विध्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, भाएसोचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाई जैन, डिप्लोमा कॉलेजचे सी. ई.ओ. कार्तिक जैन, एस डी परमार इंग्लिश मेडियम स्कुलचे संचालक सुरेश जैन यांनी आंतराष्ट्रीय योग दिनानिमित्त पभारतीय विद्या संकुलनाचे कर्मचारी व विद्यार्थीवर्ग यांना शुभेच्छा दिल्या.

# अंजुमन महाविद्यालयात योग दिवस

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा पदवी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि क्रीडा विभाग यांचातर्फे शुक्रवारी प्रभारी प्राचार्य डॉ. साजीद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिवशी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या वेळी प्रसिद्ध योग प्रशिक्षक डॉ. निशा गोडसे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून दिले आणि त्याचबरोबर ऑनलाइन शिबिरांद्वारे योगाचे विशेष आसने, विद्यार्थी आणि शिक्षकांना योगाचे मानसिक आणि आध्यात्मिक फायदे समजावून सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. फिरोज शेख, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. शोएब खान व विद्यार्थी प्रतिनिधी हुमेरा घारे, सहिमा मुकादम, अरफा कलबसकर यांनी परिश्रम घेतले.



# कर्जतमध्ये वृक्षारोपणासह, वृक्षसंगोपनाचा संकल्प

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने ग्रामीण भागात महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृक्षारोपण केले. या वेळी वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आला.

कर्जत तालुक्यातील राष्ट्रवादी महिला काँग्रेसने संपूर्ण तालुक्यात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविला. कर्जत तालुक्यातील महिला संघटनेने महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्षा उमा मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत शहरात गुरूनगर येथे झाडे लावून या उपक्रमाचा शुभारंभ केला. तालुक्यातील कडाव, दामत, रजपे, शेलू, वाकस, पोशिर, कळंब, खांडस, वेनगाव, पाली, नेरळ, सावेळे या ग्रामपंचायतीसह वेगवेगळ्या गावात वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला.



याप्रसंगी अॅड. रंजना धुळे यांनी झाडे लावा निसर्ग वाचवा असे आपण नेहमी म्हणतो परंतु मला वाटते की, झाडे लावा आणि स्वतःला, माणसाला वाचवा असे म्हटले तर जास्त योग्य होईल कारण निसर्गाला आपण वाचवत नाहीत. निसर्ग स्वतः चे रक्षण करण्यास समर्थ आहे.. म्हणून माणसाने स्वतःच्या तसेच येणाऱ्या पिढीच्या भवितव्यासाठी झाडे लावली पाहिजेत, असे स्पष्ट केले. या वेळी शहराध्यक्षा मधुरा चंदन, माजी नगरसेविका भारती पालकर, सोनम सुर्वे, आरतीदीक्षित, कल्पना देशमुख आदी उपस्थित होत्या.

## निवडक

### सेंट फ्रांन्सीस न्यू चर्चमध्ये चोरी

**पनवेल :** शहरातील सेंट फ्रांन्सीस न्यू चर्च (सीएनआय) या चर्चमध्ये अज्ञात चोरट्यांनी चोरी करून रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे. येथील सेंड फ्रांन्सीस न्यू चर्च या चर्चच्या पाठीमागील दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने आतमध्ये प्रवेश करून चर्चमधील कपाटात असलेल्या दानपेटीमधील पाच हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### परिवहन अधिकारीपदी जयंत पाटील

**पनवेल :** प्रादेशिक परिवहन अधिकारी कोकण विभागपदी जयंत पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. तत्पूर्वी कळंबोली येथील कार्यालयात अनिल पाटील हे परिवहन अधिकारी म्हणून कार्यरत होते, परंतु त्यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी ठाणे येथे कार्यरत असणारे जयंत पाटील यांना बढती मिळून त्यांची या ठिकाणी बदली झाली असून त्यांच्या अखत्यारीत सिंधुदूर्ग, रत्नागिरी, पेण, पनवेल या कोकण विभाग असणार आहे.

### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त कीर्तन



**पनवेल :** शिवराज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पनवेल येथील रामदास मारुती मंदिरामधे ह. भ. प. प्रशांत डोंगरे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पनवेल येथील वाल्मिकी शाखेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रशांतबुवा यांनी विविध कथांच्या माध्यमातून प्रयत्नवादाचे महत्त्व स्पष्ट करून सांगितले. उत्तररंगामध्ये त्यांनी शिवजन्मापासून ते राज्याभिषेक होईपर्यंतचे शिवचरित्र आपल्या ओघवत्या वाणीमधे कथन केले. चंद्रकांत मने यांनी त्याना संवादिनी व शार्दूल डोंगरे यांनी तबलासाथ केली.

### नवी मुंबईत योग दिन उत्साहात

**नवी मुंबई :** 'स्वत:साठी व समाजासाठी योग' या संकल्पनेवर आधारित यावर्षीचा दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभरात साजरा होत असताना नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासह नमुंमपा अधिकारी-कर्मचारी यांनी सिडको एक्झिबिशन सेंटर येथे झालेल्या 'योग मंत्रा' या विशेष कार्यक्रमात सहभागी होत योग दिन उत्साहात साजरा केला. या वेळी ऐरोली विधानसभा सदस्य आमदार गणेश नाईक, बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदा म्हात्रे, माजी आयुक्त विजय नहाटा, आयुक्त कैलास शिंदे व इतर मान्यवर उपस्थित होते.



**उरण : शहरासह ग्रामीण भागात महिलांनी वटपौर्णिमा मोठ्या आनंदात साजरी केली. शहरात देवूळवाडी, श्री राघोबा मंदिर जवळ, मोरा, बोरी नाका, बोरी गाव व इतर ठीक-ठिकाणी पूजा केली. नंदू उपाध्ये (गुरुजी) यांनी यथासांग पूजा सांगितली.**

# नवी मुंबईत मार्केट इमारतींचा आढावा

## वास्तू वापरात आणण्याच्या आयुक्तांच्या सूचना

**नवी मुंबई : बातमीदार**

पालिकेच्या बांधून तयार झालेल्या वास्तू विहित प्रयोजनासाठी वापरात याव्यात असे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागांच्या आढावा बैठकीत दिले होते. त्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील मार्केटच्या इमारती वापरात येण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांसह मार्केट इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करुन त्या वापरात येण्याच्या दृष्टीने मौलिक सूचना केल्या. सूचना केलेल्या बाबींची तातडीने अंमलबजावणी करुन ही मार्केट तत्परतेने सुरु करावीत, असे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

यामध्ये दिवाळेगाव येथील मासळी मार्केटची पाहणी करताना आयुक्तांनी तेथील अंतर्गत व परिसर स्वच्छतेवर अधिक भर देण्याच्या सूचना केल्या. त्या ठिकाणी सदयस्थितीत पोर्टेबल स्वरुपाची शौचालये ठेवलेली असून तेथे कायमस्वरुपी शौचालय बांधावे असे निर्देश आयुक्तांनी दिले. तेथील भाजीपाला व फळे विक्रीसाठीचे गाळे योग्य विक्रेत्यांना वितरीत करण्याची कार्यवाही तत्परतेने करण्याचेही निर्देशित करण्यात आले. दिवाळेगाव परिसरात विशेषत्वाने खाडी किनाऱ्याच्या भागात तेथील नागरिकांच्या लोकसहभागातून स्वच्छता मोहिम राबवावी अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. या वेळी तेथील विक्रेत्यांशीही आयुक्तांनी संवाद साधला व त्यांचे म्हणणे जाणून घेतले.

सेक्टर ४ सानपाडा येथील भूखंड क्र.१७ वर महानगरपालिकेने बांधलेल्या दैनंदिन बाजार इमारतीची पाहणी करताना विक्रेत्यांना व ग्राहकांना सोयीचे व्हावे यादृष्टीने तेथील ओटल्यांची रचना काहीशी बदलून ती टेबल



स्वरुपाची करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. हे काम तत्परतेने करुन मार्केट त्वरित वापरात आणण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मार्केटच्या आतील भागात हवा खेळती रहावी यादृष्टीने वरील छताचा भाग डिझाईन बिघडू न देता बाहेरच्या बाजूला वेदरशेड सारखा वाढवावा व वरील बाजू हवा येण्या-जाण्यासाठी खुली ठेवावी अशा सूचना करण्यात आल्या.

या व सर्वच मार्केटमध्ये स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छतेचे संदेश मोठया प्रमाणावर प्रसारित करावेत तसेच सर्व मार्केट्स प्लास्टिक पिशवीमुक्त असावीत असेही आयुक्तांनी निर्देशित केले. अशाचप्रकारे से.१४, सानपाडा येथील मार्केटमध्येही बाहेरच्या बाजूस वेदरशेड करण्याच्या सूचना करुन त्याठिकाणी असलेल्या दुसऱ्या प्रवेशव्दारावरुन नागरिकांना सुलभतेने ये-जा करण्यासाठी तेथे पायऱ्यांची व्यवस्था करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

या दौऱ्यावेळी आयुक्तांसमवेत अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड तसेच परिमंडळ १चे उपायुक्त सोमनाथ पोटरे, परिवहन व्यवस्थापक योगेश कडुसकर, सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

### पावसाळी स्थितीचीही पाहणी

या वेळी मासळी विक्रेत्यांशी चर्चा करून त्यांचे म्हणणे आयुक्तांनी जाणून घेतले. या मार्केटच्या अंतर्गत भागातील सुधारणा तत्परतेने करून घ्याव्यात व मार्केटची इमारत लगेच वापरात आणावी असे निर्देश देण्यात आले. सर्वच मार्केटमध्ये अंतर्भागात पाणी वाहून जाण्यासाठी असलेल्या छोटया गटारींमध्ये पाणी थांबून राहणार नाही अशाप्रकारे उतार असावा व टाईल्स असाव्यात असेही आयुक्तांनी सूचित केले. या दौऱ्याच्या अनुषंगाने आयुक्तांनी नवी मुंबई क्षेत्रातील पावसाळी स्थितीचीही पाहणी केली व निदर्शनास आलेल्या बाबींमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## 'सीवुड्समधील रहिवाशांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबध्द'

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सहकारी गृहनिर्माण संस्था बऱ्याचदा इतक्या समस्यांनी ग्रासलेल्या असतात की सोसायटीतील सामान्य सदस्याला परिस्थिती कशी हाताळायची हे जाणून घेणे कठीण होते. याच अनुषंगाने सीवूड्स येथील सेक्टर - २७ मधील विओम तसेच एअर इंडिया कॉलनी येथील सदस्यांसमवेत आमदार मंदा म्हात्रे यांची बैठक झाली. तसेच सोसायटीमधील रहिवाश्यांनी आमदार म्हात्रे यांच्याकडे विविध प्रकारच्या समस्या मांडल्या.



या समस्यांमध्ये सोसायटीतील पाणी टंचाई, रस्ते, अभिहस्तांतरण, मालमत्ता कर अशा अनेक समस्या आमदार मंदा म्हात्रे यांचे समोर मांडल्या. तसेच नवी मुंबई पालिकामधील अधिकाऱ्यांना दूरध्वनीद्वारे संपर्क करून सदर पाणी टंचाई व मालमत्ता कर संदर्भात प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश आमदार मंदा म्हात्रे यांनी अधिकाऱ्यांना दिले. तसेच सिडको प्राधिकरणाच्या अंतर्गत येणारी सोसायटीमधील जी काही महत्वपूर्व कामे आहेत त्या संदर्भात सिडको अधिकाऱ्यांशी संपर्क करून त्या विषयी येत्या सोमवारपर्यंत सिडको व्यवस्थापकीय संचालक यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात येत असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले. तसेच सोसायटीमधील समस्यांचे निवारण लवकरच मार्गी लागत असल्याने विओम तसेच एअर इंडिया कॉलनीमधील रहिवाश्यांनी आमदार मंदा म्हात्रे यांचे आभार मानले.

या वेळी माजी नगरसेवक सुनील पाटील, माजी उपआयुक्त पेंढारी साहेब, समाजसेवक रणजीत नाईक, समाजसेविका प्रणिता नाईक, एअर इंडिया कॉलनीचे अध्यक्ष मनोहर ढेम्बरे, बी.के.पाटील तसेच सोसायटीतील असंख्य नागरिक उपस्थित होते.

## गाढी नदीच्या प्रवाहात अडकलेल्या म्हशींना जीवदान

**पनवेल : वार्ताहर**

संततधार पडणाऱ्या पावसामुळे गाढी नदीचा प्रवाहात अडकून पडलेल्या १८ म्हशींना पनवेल अग्निशमन दलाने तीन तासाच्या अथक प्रयत्नांनंतर बाहेर काढून जीवनदान दिले.

डोंगर भागातदेखील मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असून ते पाणी गाढी नदीच्या पात्रात जात आहे. ही गाढी नदी पनवेल शहरालगत वाहत असते. याच नदीचे पात्रात पाण्याची पातळी वाढू लागली. ही पातळी वाढण्याच्या आधी भिंगारी टाटा कँप जवळील नदी पात्रात १८ म्हशी या चरण्यासाठी आणि पाणी पिण्यासाठी गेल्या होत्या. जसजसे पाणी वाढू लागले या म्हशींना बाहेर येणे मुश्कील होऊन बसले. त्या हंबरडा फोडू लागल्या. हे दृश्य शेजारीच असलेल्या कल्पतरू रिव्हर साईडमधील एका महिलेला दिसले. त्या महिलेने लागलीच पनवेल महापालिकेच्या अग्निशमन विभागाला संपर्क साधला. त्या वेळी तातडीने कोळखे येथील आग आटोक्यात आणल्यानंतर त्वरीत ठिकाणी अग्निशमन दल पोहचले. त्यांनी प्रथम पाण्यात उतरून म्हशींना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

यानंतर अग्निशमन दलाच्या पथकाने तराफ्याच्या सहाय्याने या १८ म्हशींना नदीच्या किनारी सुखरूप बाहेर काढले. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## धोकादायक इमारतीची नळजोडणी तोडली; महापालिकेची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

कांदा, बटाटा बाजारातील प्रशासकीय इमारतीतील एपीएमसी सचिवांच्या दालनातील छताचा भाग सोमवारी कोसळला होता. त्या अनुषंगाने आता महापालिका प्रशासन सतर्क झाले असून बुधवारी (दि.१९) महापालिकेने एपीएमसीमधील धोकादायक इमारतीतील नळजोडणी खंडित केली आहे.

कांदा बटाटा बाजार, प्रशासकीय इमारत, मॅफको मार्केट आणि मसाला बाजार येथील नळजोडणी खंडित करण्यात आली आहे. अतिधोकादायक इमारतींच्या प्रश्नावर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी ॲक्शन घेतली आहे. नवी मुंबई महापालिकेच्या तुर्भे विभाग कार्यालयातून ही कारवाई करण्यात आली आहे.

गेल्या कित्येक वर्षांपासून अतीधोकादायक असलेल्या कांदा बटाटा, मसाला व मॅफको मार्केटमध्ये वारंवार स्लॅप कोसळल्याच्या घटना या पूर्वी घडल्या आहेत. दोन दिवसांपूर्वीच प्रशासकीय इमारतीतील सचिव पी. एल. खंडागळे यांच्या खुर्चीवर स्लॅप कोसळला होता. मागील वर्षी कांदा बटाटा बाजारातील लिलागृहाची कमानी तसेच काही गाळ्यातील सज्जा भाग कोसळले होते. गेली अनेक वर्षे या मार्केटमधील धोकादायक इमारतीतील गाळे धारकांना गाळे खाली करण्याकरिता नोटीस पाठवण्यात येत आहे, मात्र तरीदेखील तेथे व्यावसायिक व्यापार सुरूच आहे.



**पनवेल : तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तकृपा सेंद्रिय शेती गट आकुळवाडी येथे गटातील सर्व सदस्यांना, जांभिवली येथील शेतकरी बांधवांना व गटातील सदस्यांना मंडल कृषी अधिकारी हेगडे, कृषी पर्यवेक्षक बिचुकले व कृषी सहाय्यक प्रसाद पाटील यांचेमार्फत आत्मा योजनांतर्गत परसबाग भाजीपाला मिनी किट वाटप करण्यात आले, तसेच पीएम किसान योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, माती नमुने, भात लागवड इतर शेतीविषयक माहिती देण्यात आली.**

## सायन-पनवेल महामार्गावर लोकसहभागातून स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातून जाणारा सायन पनवेल महामार्ग हा जरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असला तरी या मार्गावरून दररोज बाहेरच्या शहरातील हजारो नागरिक ये - जा करीत असल्याने तो स्वच्छ असणे नवी मुंबईच्या स्वच्छ शहर मानांकनासाठी महत्वाचे आहे. त्यादृष्टीने नवी मुंबई महापालिकेच्या वतीने नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रत्यक्ष सहभागातून सायन पनवेल महामार्गावर बेलापूर ते वाशी मार्गावर दोन्ही बाजूकडे सखोल स्वच्छता मोहीम लोकसहभागातून राबविण्यात आली.

यामध्ये अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व शिरीष आरदवाड, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १चे उपायुक्त सोमनाथ पोटरे, अति. शहर अभियंता अरविंद शिंदे तसेच सर्व विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता, स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक तसेच इतर अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतामित्र यांचेसह नागरिक व एनएसएस विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होते.

सायन-पनवेल महामार्गावर उरण फाटा येथे बेलापूर व नेरूळ विभागाच्या अख्यत्यारितील अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतामित्र, नागरिक व एनएसएस विद्यार्थी एकत्र जमले. याठिकाणी आयुक्तांनी सायन पनवेल महामार्गावरील सखोल स्वच्छता मोहीमेचे महत्व सांगत यापुढील काळात शहरातील मुख्य रस्ते तसेच विविध भागात शनिवार व रविवारी एकत्र येऊन लोकसहभागातून स्वच्छता मोहीमा राबविण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. या मोहीमांमध्ये नागरिकांच्या सहभागाला प्राधान्य देण्याची भूमिका विषद करीत नागरिकांनी यामध्ये स्वयंस्फुर्तीने सहभागी होऊन शहर स्वच्छतेत सक्रिय योगदान द्यावे असे आवाहन केले.

याठिकाणी उपस्थितांनी आयुक्त महोदयांसमवेत स्वच्छतेची सामुहिक शपथ ग्रहण केली आणि आयुक्तांसमवेत सर्वजणांनी सायन पनवेल महामार्गाकडेच्या प्लास्टिक, कागद व इतर कचऱ्याच्या संकलनाला सुरूवात केली. तेथील उड्डाणपुलाखालील जागेतही सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

सायन पनवेल महामार्गावरील नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीतील बेलापूर, नेरूळ, तुर्भे, वाशी विभाग कार्यालयांच्या वतीने त्या त्या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या. आयुक्तांनी याही ठिकाणी भेट देत तेथील स्वच्छता मोहीमेत प्रत्यक्ष सहभाग घेतला. या मोहीमेत इतरही विभाग कार्यालयांचे अधिकारी, कर्मचारी, स्वच्छताकर्मी उत्साहाने सहभागी झाले होते.



## वटपौर्णिमेनिमित्त वडाचे वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

वटपौर्णिमेच्या सणाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील महिला कर्मचारी यांनी वृक्षारोपण करून झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश प्रसारित करण्याचे ठरविले आणि १८ वडांचे वृक्षारोपण केले.

नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालय इमारतीच्या आवारात महापालिका सचिव चित्रा बाविस्कर आणि उदयान विभागाच्या सहा आयुक्त ऋतुजा गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत ५० हून अधिक महिला कर्मचाऱ्यांनी अत्यंत उत्साहाने वृक्षारोपण केले. आयुर्वेदात अत्यंत महत्वाचा वृक्ष असलेला वटवृक्षाची एकूण १८ रोपाची लागवड करण्यात आली.

वटपौर्णिमेचे औचित्य साधून वृक्षांचे महत्व अधोरेखीत करणारा हा नवी मुंबई महापालिका महिला कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन राबविलेला अभिनव उपक्रम परंपरा जपत आधुनिकतेशी सांगड घालणाऱ्या स्त्री शक्तीची सर्वसमावेशकता प्रदर्शित करणारा आहे. अशाप्रकारे वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या नवी मुंबई महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांच्या पर्यावरणप्रेमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

## युईएस कॉलेजमध्ये जागतिक योग दिवस

**उरण : वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे यंदाही युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी आणि उरण तालुका विधी समिती व उरण बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक योग दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला यु. ई. एस. संस्थेचे विश्वस्त सदस्य व माजी अध्यक्ष ॲड. राजेंद्र भानुशाली, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या मिनाक्षी गुप्ता, स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, सिनिअर कॉलेजच्या एचओडी आणि पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका तसेच जॉईंट सिव्हिल जज ज्युनिअर डिव्हीजन, उरण गुरमीर कौर राज नारायण टंडन, उरण तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. विजय पाटील, उरण तालुका बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. किशोर ठाकूर, ॲड. पराग म्हात्रे तसेच अजिंक्य गुरव उपस्थित होते.

सर्वांत प्रथम स्कूल व कॉलेजच्या वतीने सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



त्यानंतर जागतिक योग दिवसाच्या निमित्ताने ज्यु. कॉलेजच्या शिक्षिकेने 'योगा' विषयीची संपूर्ण माहिती सर्वांना सांगितली. त्यानंतर स्कूल व कॉलेजच्या क्रिडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्राणायाम, मुद्रा, आसन, ध्यान, इत्यादी सर्व योगासने उपस्थित सर्व मान्यवर, व स्कूल, ज्युनिअर आणि सिनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून व शिक्षकांकडून करुन घेण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, ज्यु.कॉलेजच्या शिक्षिकेने केले. अशा रीतीने शरीर व मन सक्षम करुन, मनाला शांती देणारा 'जागतिक योग दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.

## निवडक

### ट्री हाऊसमध्ये योग दिन साजरा



**पेण** : तालुक्यात वैकुंठ पाटील मित्र मंडळातर्फे ट्री हाऊस हायस्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला. या वेळी भाजप दक्षिण उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, कामगार मोर्चा विधानसभा जिल्हा संयोजक निळकंठ म्हात्रे, ट्री हाऊसमधील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी बोलताना सांगितले की, योगासने केल्याने आपला शरीर सुदृढ राहते. त्यामुळे योगासने करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमामध्ये ट्री हाऊसमधील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

### शाळांना ई-लर्निंग किट व वह्या भेट



**माणगाव** : रोटरी क्लब ऑफ मुंबई सेंट्रलच्या सहकार्याने क्लबच्या माजी अध्यक्षा काजल थडानी, संचालक आणि तालुक्यातील शिरवलीचे दत्ताराम पांडुरंग शिंदे यांच्या माध्यमातून १० जिल्हा परिषद शाळांना ई-लर्निंग किट व वह्या भेट स्वरूपात देण्यात आल्या. राजिप शाळा खांदाड येथे पार पडला. या कार्यक्रमाला क्लबच्या अध्यक्ष काजल थडानी, संचालक दत्ताराम शिंदे, न. पं. नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार, डॉ. संतोष कामेरकर, माजी पं. स. सदस्य शैलेश भोनकर, खांदाड शाळा समिती अध्यक्ष महेश पोवार, उपाध्यक्ष कैलास पोवार, समाजसेवक विजय शिंदे, महेश महादेव पोवार, संजय मालोरे, अर्बन, मुख्याध्यापक वेदपाठक, अंबुर्ले, संगीता धुमाळ, प्रमोद जाधव, उपाध्यक्ष सुनील राजभर, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

### माउंट कारमेल हायस्कूलमध्ये योग दिन



**मुरूड** : माउंट कारमेल हायस्कूल येथे योगा दिन साजरा करण्यात आला. इ. पहिली ते दहावीमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. या वेळी मुख्याध्यापिका सिस्टर ज्यूली चांदी, रोशन मार्टिस, सुरेश वेगस, राजेंद्र घोसाळकर, शोधन बळकवडे, अक्षता म्हात्रे, शुभांगी पंची, वित्रीण वेगस, सिस्टर शोभा त्रिभुवन, सुनील वेगस, फ्लाविया मार्टिस, वैशाली दळवी, शिक्षकेतर कर्मचारी अल्बर्ट मार्टिस, मुख्य लिपिक हेंरी वेगस, लुसीअन गोम्स आदी उपस्थित होते.


### नेणवली शाळेत योग दिन उत्साहात



**पाली** : राजिप शाळा नेणवली येथे शुक्रवारी (दि.२१) आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून सुधागड तालुका गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आतोणे केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांच्या प्रेरणेने शाळेत योगोत्सवाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, योगदिन सुरुवात कशी झाली, योगाची परंपरा याबाबत सविस्तर विवेचन व व्हिडीओ दाखवून मार्गदर्शन मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी केले. त्यानंतर प्रत्यक्ष योगासन सुरुवात झाली. यामध्ये पूरक हालचाली घेऊन शरीर योगासाठी लवचिक करण्यात आले. नेणवली अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांनीही सहभागी होऊन योगाचा आंनद घेतला.

### प्राथमिक शाळांममध्य योग दिन

**चौक** : जागतिक योगा दिनाचे औचित्य साधून राजिप खालापूर तालुक्यातील शाळांमधून योगा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी योगा जागृती अभियान राबविण्यासाठी गावातून प्रभातफेरी काढून योगाबाबत जनजागृती केली. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी योगा करून योगा दिवस साजरा केला. या वेळी योगागुरूंनी योगाचे आपल्या जीवनातील महत्त्व विषद केले. त्याचप्रमाणे विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी योगासनांचे प्रात्यक्षिक केले.



# काशिद समुद्रकिनारा दोन महिन्यांसाठी बंद

## पावसामुळे प्रशासनाने घेतली दक्षता



**मुरूड : प्रतिनिधी**

पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेला मुरुड तालुक्यातील काशिद बीच हा पावसाळ्यात दोन महिन्यांसाठी बंद करण्यात आला आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून रस्त्यालगत सूचनाफलक लावण्यात आले आहेत.

काशिद समुद्रकिनाऱ्यावरील विविध खाद्यपदार्थ, खाद्यपेय स्टॉल्स दरवर्षीप्रमाणे पावसाळ्यातही यंदा १८ जून ते १४ ऑगस्ट या कालावधीत बंद ठेवण्यात आले आहेत.

मुरूड तालुक्यातील काशीद समुद्रकिनारी मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. शनिवार, रविवार या दोन दिवसांत नेहमीच हजारो पर्यटक येथे गर्दी करतात. सध्या पावसाळा असल्याने समुद्र खवळलेला आहे. अशी गंभीर परिस्थिती असतानाही काही हौशी पर्यटक पोहण्यासाठी जातात व नाहक जीव गमवतात. यासाठी स्थानिक प्रशासनाने सर्व स्टॉल बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व स्टॉल बंद ठेवल्याने पर्यटकांना कोणतीही सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे पोहण्यासही पर्यटक जाणार नाहीत.

याठिकाणी असलेल्या स्पीड बोट, बनाना बोट, पॅरासेलिंग बोट मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात बंद करण्यात आल्या होत्या. पावसाळ्यात येथील विविध स्टॉल्स दोन महिन्यांसाठी बंद करण्यात आले आहेत. या कालावधीत येथे सूचनांचे पालन करावे, असे आवाहन ग्रामपंचायत, ग्रामस्थ आणि स्टॉलधारकांतर्फे करण्यात आले आहे.

याबाबत काशीद ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष राणे यांनी सांगितले की, काशीद समुद्रकिनारी ४७ स्टॉलधारक आहेत. पर्यटकांना विविध सुविधा त्यांच्याकडून मिळत असतात. सध्या समुद्र खवळलेला आहे. पर्यटकांनी पाण्यात पोहण्यासाठी जाऊ नये, यासाठी ग्रामपंचायतीतर्फे समुद्रकिनारी बॅनरसुद्धा लावण्यात आले आहेत. पावसाळी हंगामात सर्व स्टॉल बंद ठेवण्यात येतात. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षक नियुक्त करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

## सकल मराठा समाजातर्फे शालेय दाखले, जातनोंदणीबाबत निवेदन



**धाटाव : प्रतिनिधी**

सरकारी दप्तरात नोंदी तपासून समाजबांधवांना तातडीने दाखले देणे, आजगायत कुणबी मराठा किती नोंद सापडल्या, किती दाखल्यांचे वाटप करण्यात आले, याबाबत चर्चा करण्यासाठी सकल मराठा समाजाचे अध्यक्ष आप्पा देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.२१) तहसीलदार किशोर देशमुख यांची भेट घेतली.

तालुक्यातील सर्वच विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या दाखल्यांना विलंब होत आहे. दाखल्यांसाठी विद्यार्थी, त्यांचे पालक दररोज पायपीट करीत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दाखल्यांसाठी नेमकी अडवणूक कुठे होते? यावर चर्चा केली. चर्चेअंती तहसीलदार किशोर देशमुख यांनी शालेय विविध दाखले देण्याची प्रक्रिया जलद सुरू आहे. उर्वरीत प्रलंबित दाखले तत्काळ दिले जातील, असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

चर्चेतून विद्यार्थ्यांच्या दाखल्यांचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल हे स्पष्ट झाल्याने विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त केले. कुणबी मराठा सरकारी दप्तरातील नोंदी, दाखल्यांचे वाटप, त्यातील त्रुटी यावरही चर्चा करण्यात आली.

## मुरूड तालुक्यात वटपौर्णिमा साजरी



**मुरूड** : वटपौर्णिमेच्या दिवशी महिला वडाची पूजा करून आपल्या पतीच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात. हा वटपौर्णिमेचा सण मुरुडमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला.

मुरूड गुरव पाखाडीजवळील शिवमंदिराजवळील वडाची पुजा करण्याकरिता सकाळपासूनच महिलांननी गर्दी करीत ब्राह्मणांच्या मंत्रघोषात वटवृक्षाची मनोभावे पुजा केली. स्त्रियांमधील बंधुभाव वटपौर्णिमा हा स्त्रीयांमधील बंधुभावाचा सण आहे. या दिवशी स्त्रिया एकत्र येऊन वटवृक्षाची पुजा करून एकमेकांना सौभाग्याचे प्रतीक म्हणून वाण भेट देऊन एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## रायगडतील विविध महाविद्यालयांमध्ये योग दिन उत्साहात साजरा



**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरून रायगड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयांमध्ये योग मार्गदर्शनपर कार्यशाळा, योग प्रात्यक्षिके, प्रभातफेऱ्या, व्याख्याने, भित्तीपत्रक स्पर्धा, प्रतिज्ञा, कुटुंबासोबत योग प्रात्यक्षिक फोटो आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांत जिल्ह्यातील हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट महाविद्यालय महाड, शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय कळंबोली, डी. डी. विसपुते महाविद्यालय पनवेल, पिल्लई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पनवेल, टीकमभाई मेहता महाविद्यालय माणगाव, मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालय नेरळ, डी.जी. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा. गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय श्रीवर्धन, केएलई महाविद्यालय कळंबोली, कोएसो. आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालय नागोठणे, महात्मा फुले कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पनवेल, जी. एम. वेदक विज्ञान महाविद्यालय तळा, शेठ जे.एन. पालीवाला महाविद्यालय पाली, बार्न्स महाविद्यालय पनवेल, कोएसो लक्ष्मी शालिनी महिला महाविद्यालय पेझारी, के. जी.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय उरण, उरण एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी उरण, जी. एम. वेदक अभियांत्रिकी महाविद्यालय तळा, जेएसएम महाविद्यालय अलिबाग, कोएसो डॉ.सी.डी. देशमुख महाविद्यालय रोहा, वसंतराव नाईक महाविद्यालय मुरूड, अंजुमन इस्लाम डिग्री महाविद्यालय मुरूड, पिल्लई एचओसी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रसायनी, एम.बी.मोरे महिला महाविद्यालय धाटाव, सुंदरराव मोरे महाविद्यालय पोलादपूर, सीकेटी महाविद्यालय पनवेल, वीर वाजेकर महाविद्यालय उरण, कोकण ज्ञानपीठ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कर्जत, कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालय कर्जत या महाविद्यालयांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

## फार्मसी महाविद्यालयात योग दिनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात शुक्रवारी योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये योग दिनानिमित्त एका विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. योगशिक्षिका अमृता धोतरकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, प्रा. अक्षता गीध आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात योग दिनाचे महत्व विषद केले. मांडे यांनी, या धकाधकीच्या जीवनात आपल्यासाठी दररोज केवळ २०-२५ मिनिटे काढली तरी योग साधना करण्यासाठी पुरेशी आहेत. योगामुळे आपले शरीर सुदृढ होईलच, शिवाय आपले मनही शांत राहील. विद्यार्थ्यांना योगसाधनेचा आयुष्यभर फायदा होईल, असे सांगितले.

धोतरकर यांनी, योग्य रितीने योगासने केल्यास सर्व रोग दूर होतात. दवाखान्यापासून व औषधांपासून दूर रहायचे असल्यास नियमित योगासने केली पाहिजेत. आपल्यासाठी आपणच वेळ काढला पाहिजे तरच आपण निरोगी राहू, असे स्पष्ट केले. त्यानंतर त्यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांकडून योग प्रात्यक्षिके करून घेतली. सूत्रसंचालन प्रा. गीध यांनी केले.

## चित्रकला स्पर्धेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**चौक : प्रतिनिधी**

चित्रकलेच्या माध्यमातून जागतिक पर्यावरण दिवस आणि माझी वसुंधरा कार्यक्रमाची अंमलबजावणी प्राथमिक शाळा वडगाव यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला.

राजिप शाळा वडगाव येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी इ. पहिली ते तिसरी, इ. चौथी व पाचवी, इ. सहावी ते आठवी अशा तीन गटांत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ९०पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. यातून प्रत्येक गटातून प्रथम व द्वितीय येणाऱ्या मुलांना रोख पारितोषिक गौरी महादेव गडगे यांच्या वतीने देऊन गौरविण्यात आले.

पहिली ते तिसरी गटात रोनक जांभुळकर प्रथम, स्वराली घोरपडे द्वितीय, चौथी ते पाचवी गटात समर्थ मुंढे प्रथम, मनस्वी गडगे द्वितीय तर सहावी ते आठवी गटात यश पाटील प्रथम व कृतिका गडगे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी स्पर्धकांना मुख्याध्यापक सुभाष राठोड व गौरीत गडगे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या वेळी उपशिक्षक वौजिनाथ जाधव, विषय शिक्षिका सरस्वती कवाद, स्वयंसेविका निकिता गडगे, साक्षी जांभुळकर, भाग्यश्री तांबोळी सोनू जाधव व पालकवर्ग उपस्थित होते.

## पेण वाशी येथील साईबाबा मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा



**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील वाशी येथे गुरुवारी (दि.२०) साईबाबांच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. २००० साली पहिल्यांदा साईबाबा, ज्ञानेश्वर व सद्गुरु बाबांची मूर्ती बसवण्यात आली होती. त्यानंतर २४ वर्षांनी मंदिराचा जीर्णोद्धार झाला. ग्रामस्थ, वाशी, ओढांगी ग्रामस्थ, हरिपाठ मंडळ अक्कादेवी सरेभाग सर्व हरिपाठ मंडळ वाशी ओढांगी यांच्या सौजन्याने मूर्तीची शोभायात्रा काढण्यात आली.

मूर्तीला अभिषेक घालण्यात आला. या वेळी नागावचे पुरोहित पुरुषोत्तम महाराज व त्याच्या सहकार्यांनी होम हवन व मंत्रघोष केले. देवस्थानच्या ट्रस्टींमार्फत विधिवत मूर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर आरती घेण्यात आली. या वेळी संगीताचार्य दत्तबुवा ओढांगीकर उपस्थित होते. साईबाबा देवस्थानचे अध्यक्ष मधुकर म्हात्रे, उपाध्यक्ष रमेश म्हात्रे ,सचिव संतोष म्हात्रे हे उपस्थित होते.

सायंकाळी ५ वाजता अक्कादेवी हरिपाठ मंडळ, सरेभागाचा हरिपाठ भजन मंडळ वाशी यांचा भजन झाल्यावर महाभोजन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

## आयबीएन व सीएफआयतर्फे मालेवाडी डीसीसी सेंटर सुरू

**पेण : प्रतिनिधी**

चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया ही संस्थतर्फे मालेवाडी येथे आयबीएन व सीएफआय यांच्या संयुक्त विद्यमाने डीसीसी सेंटर सुरू करण्यात आले.

आदिवासी भागातील लहान मुलांना शासनाची अंगणवाडी खूप लांब पडत असल्याने त्यांना तिथे स्वतःहून जाणे शक्य नाही, तसेच त्यांचे आई-वडील मोलमजुरीला जात असल्याने त्यांनाही मुलांना नेऊन सोडणे व घेऊन येणे शक्य नाही. यामुळे सीएफआय संस्थेचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख व आयबीएन संस्थेच्या हेगे मॅडम यांनी डीसीसी सेंटरसाठी स्पोन्सर शोधून सेंटर सुरू केले.

या मुलांना अभ्यासाची ओळख होऊन ते इतर मुलांसोबत अभ्यासात पुढे जाऊ शकतात व त्यांना अभ्यासाची आवडही निर्माण होईल हाच उद्देश या सेंटरचे असल्याचे डॉ. किशोर देशमुख यांनी सांगितले.



# दक्षिण आफ्रिकाचा इंग्लंडवर विजय

## सात धावांनी केला पराभव

**सेंट लुसिया : वृत्तसंस्था**

गतविजेत्या इंग्लंडला टी-२० वर्ल्डकपच्या सुपर ८ गटातील दुसऱ्या सामन्यात विजयाने थोडक्यात हुलकावणी दिली. २०व्या षटकात एडन मार्करमने घेतलेला परतीला झेल सामन्याला कटालणी देणारा ठरला. इंग्लंडला विजयासाठी १८ चेंडूंत २५ धावांची गरज असताना कागिसो रबाडाने सेट फलंदाज लिएम लिव्हिंगस्टोनला माघारी पाठवून हॅरी ब्रूकसोबतची ७८ धावांची भागीदारी तोडली. त्यानंतर मार्को यानसेन व एनरिच नॉर्खियाने अखेरच्या दोन षटकांत सामना खेचून आणला.



क्विंटन डी कॉकने ३८ चेंडूंत ४ चौकार व ४ षटकारांसह ६५ धावा केल्या. क्विंटन व रिझा हेंड्रिक्स (१९) यांनी पहिल्या विकेटसाठी ९.५ षटकांत ८६ धावा जोडल्या. सहा धावानंतर क्विंटन माघारी परतला आणि इंग्लंडच्या गोलंदाजांना पुनरागमन करण्याची संधी मिळाली. हेनरिच क्लासेन (८) रनआऊट झाला. कर्णधार एडन मार्करम (१) हाही आदिल राशीदच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. डेव्हिड मिलर खेळपट्टीवर उभा राहिला आणि त्याने २८ चेंडूंत ४ चौकार व २ षटकारांसह ४३ धावांची खेळी केली. जोफ्रा आर्चरने २०व्या षटकात मिलरसह दोन धक्के दिले. त्रिस्तान स्तब्सने नाबाद १२ धावा केल्या आणि आफ्रिकेने ६ बाद १६३ धावांपर्यंत मजल मारली.

प्रत्युत्तरात कागिसो रबाडाने दुसऱ्या षटकात फिल सॉल्टला (११) माघारी पाठवले. रिझा हेंड्रिक्सने कव्हर्सवर अफलातून झेल घेतला. जॉनी बेअरस्टो १६ धावांवर केशव महाराजच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. महाराजने त्याच्या पुढच्या षटकात जॉस बटलरची (१७) विकेट घेतली. ऑटनेल बार्टमनने ११व्या षटकात मोईन अलीला (९) माघारी पाठवले. हॅरी ब्रूक व लिएम लिव्हिंगस्टन यांनी इंग्लंडचा किल्ला लढवताना पाचव्या विकेटसाठी ३० चेंडूंत अर्धशतकी भागीदारी पूर्ण केली. इंग्लंडला ३० चेंडूंत ५९ धावा हव्या होत्या.

१६व्या षटकात बार्टमनच्या गोलंदाजीवर लिव्हिंगस्टनने सामना १८ चेंडूंत २५ धावा असा आणला. ब्रूक व लिव्हिंगस्टन यांनी ४२ चेंडूंत ७८ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. १७व्या षटकात रबाडाने ही जोडी तोडली आणि लिव्हिंगस्ट १७ चेंडूंत ३ चौकार व २ षटकारांसह ३३ धावांवर माघारी परतला. रबाडाने त्या षटकात विकेटसह फक्त ४ धावा दिल्या. मार्को यानसेनने १९व्या षटकात ७ धावा दिल्या आणि आता इंग्लंडला ६ चेंडूंत १४ धावा करायच्या होत्या. सेट फलंदाज हॅरी ब्रूक स्ट्राईकवर होता. एनरिच नॉर्खियाने स्लोव्ह चेंडू फेकला आणि ब्रूकने मिड ऑनच्या दिशेने मारलेला चेंडू एडन मार्करमने उलट पळत सुटून अप्रतिमरित्या टिपला. ब्रूक ३७ चेंडू ७ चौकारांसह ५२ धावा केल्या.

सॅम करनने तिसऱ्या चेंडूवर चौकार खेचून ३ चेंडूंत ९ धावा असा सामना जवळ आणला. चौथ्या चेंडूवर करनने धाव घेण्यास नकार दिला आणि २ चेंडूंत ९ धावा अशी मॅच आली. पाचव्या चेंडूवर १ धाव आल्याने सामना आफ्रिकेच्या खिशात आला. इंग्लंडला ६ बाद १५६ धावा करता आल्या.

# दुसऱ्या विजयासह स्पेन बाद फेरीत; गतविजेत्या इटलीवर १-० अशी मात

**गेल्सेनकिर्चेन : वृत्तसंस्था**


तीन युरो चषक विजेत्या स्पेनने सलग दुसऱ्या विजयाची नोंद करत यंदाच्या युरो फुटबॉल स्पर्धेच्या बाद फेरीत प्रवेश केला. सामन्याच्या उत्तरार्धात ५५व्या मिनिटाला झालेल्या स्वयंगोलच्या जोरावर स्पेनने इटलीचा १-० असा पराभव केला. स्पर्धेतील 'ब' गटातून सलग दुसऱ्या विजयाने स्पेनने आपली आघाडी भक्कम केली आहे.



स्पेनच्या खेळात तंत्रशुद्धता असली, तरी त्यांना यापेक्षा अधिक मोठा विजय मिळवता आला असता, मात्र तसे झाले नाही. सामन्यात तब्बल २०पैकी केवळ ९ फटकेच गोलजाळ्याच्या दिशेने गेले. मुळातच थकलेल्या इटलीच्या खेळात जोर नव्हता. त्यांना ९० मिनिटांत गोलजाळीच्या दिशेने केवळ एकच फटका मारता आला. अर्थात, दोन्ही संघांच्या फटक्यात अचूकतेचा अभाव होता. प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर स्पेनची ही सर्वोत्तम कामगिरी म्हणता येईल, असे प्रशिक्षक लुईस डी ला फुनेंटे यांनी सांगितले.

स्पेनने अनेकदा इटलीच्या बचावफीळीची परिक्षा बघितली. संघातील १६ वर्षीय लॅमिने यामलने आपल्या खेळाने आपल्याबद्दलच्या अपेक्षा अधिक उंचावल्या. सामन्याचा मानकरी ठरलेल्या निको विल्यम्सने इटलीच्या बचावपटूंवर वर्चस्व राखले. सामन्यावर वर्चस्व प्रस्थापित करुनही स्पेनला मात्र गोल नोंदविण्यात यश आले नाही. त्यांचा विजयी गोल इटलीच्याच रिकार्डो कॅलाफिओरीने केला. सामन्याच्या ५५व्या मिनिटाला झालेल्या या स्वयंगोलने स्पेनचे खाते उघडले. स्पेनच्या अल्वारो मोराटाचा हेडर अडवण्याच्या नादात कॅलाफिओरीकडून हा गोल झाला. गेल्या युरो स्पर्धेत उपांत्य फेरीत स्पेनला इटलीकडून पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव पत्करावा लागला होता. त्या पराभवाचा वचपा या सामन्यात स्पेनने काढला. स्पेनने २०१२मध्ये युरो स्पर्धेचे विजेतेपद मिळवले, त्यानंतर गेल्या तीन विश्वचषक स्पर्धांत स्पेनला साखळीतूनच बाहेर पडावे लागले होते.

# टीम इंडियाच्या प्रशिक्षकपदाबाबत गौतम गंभीरचे उत्तर



**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकाता इथे आयोजित एका कार्यक्रमात भारताचा माजी सलामीवीर गौतम गंभीर सहभागी झाला होता. निवेदकाने गंभीरला विचारले की, मी टीम इंडियाच्या भावी प्रशिक्षकाशी बोलतोय का? या प्रश्नानंतर काही सेकंद शांततेत गेली. गंभीरने विचार केला, तो हसला आणि त्याने उत्तर दिले.

गंभीर म्हणाला, मी एवढा पुढचा विचार करत नाही. तुम्ही मला सगळे कठीण प्रश्न विचारत आहात. आता काही उत्तर देणं अवघड आहे. मी आता एवढंच सांगू इच्छितो की, कोलकाता नाईट रायडर्स संघाने आयपीएल जेतेपदावर नाव कोरले. हे आमचे तिसरे जेतेपद आहे. अतिशय आनंद आणि समाधानकारक क्षण आहे. यंदाचा हंगाम म्हणजे एक वर्तुळ पूर्ण झाले आहे. मी या विजयाचा आनंद साजरा करतो आहे. आता माझ्यासाठी ते महत्त्वाचे आहे.

गंभीर पुढे म्हणाला, मी नेहमी एक गोष्ट सांगतो. क्रिकेट सांघिक खेळ आहे. एखादा खेळाडू खेळापेक्षा मोठा असू शकत नाही. संघातील प्रत्येकाकडे एक जबाबदारी असते. त्यांनी ती निभावणे अपेक्षित असते. कोलकाताच्या प्रत्येक खेळाडूने आपापली भूमिका चोख निभावली, म्हणून हे जेतेपद प्रत्यक्षात साकारु शकले.

क्रिकेटमध्ये कोणत्या गोष्टीत बदल व्हावा असे वाटते यावर गंभीर म्हणाला, एका गोष्टीत बदल व्हावा असे वाटते. वनडे आणि टी२० क्रिकेटमध्ये दोन चेंडूंचा वापर फिरकीपटूंसाठी हे अन्यायकारक आहे. त्यामुळेच वनडे आणि टी-२० प्रकारात पुरेशा प्रमाणात फिरकीपटू खेळत नाहीयेत, हे योग्य नाही.

# एमएस धोनीचा टी-२० वर्ल्डकपमधील विक्रम अबाधित

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० वर्ल्डकपमध्ये सुपर ८ सामन्यांचा थरार सुरू आहे. यादरम्यान अनेक विक्रम मोडले गेले आहेत, पण विक्रम असा आहे जो केवळ विक्रम एमएस धोनीच्या नावावर आहे.

टीम इंडियाचा सर्वाधत यशस्वी कर्णधारांमध्ये महेंद्र सिंग धोनीची गणना होते. एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया एकदिवसीय वर्ल्डकप, टी-२० वर्ल्डकप पटकावला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा करून आता धोनीला चार वर्षे पूर्ण होतील. एमएस धोनी टीम इंडियासाठी शेवटचा टी-२० सामना पाच



वर्षांपूर्वी खेळला होता, तर टी-२० वर्ल्ड कपच्या इतिसातात धोनीने तब्बल सहावेळा भारतीय संघाचा प्रतिनिधित्व केलेय. या दरम्यान धोनीने अनेक विक्रम रचले. यातला एक विक्रम असा आहे, यात धोनी आजही नंबर वन आहे. अनेक दिग्गज खेळाडूही या विक्रमापर्यंत पोहचू शकलेले नाहीत.

टी-२० वर्ल्डकपच्या इतिहासात विकेटच्या मागे सर्वाधिक फलंदाजांना बाद करण्याचा विक्रम एमएस धोनीच्या नावावर आहे. टी-२० वर्ल्डकपमध्ये धोनी ३३ सामने खेळला आहे. यात धोनीने ३२ फलंदाजांना स्टम्पमागे बाद केले आहे. धोनीने २१ वेळा झेल टिपले आहेत, तर ११ वेळा फलंदाजांना स्टम्प आऊट केले आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर पाकिस्तानाच विकेटकिपर कामरान अकमल आहे. अकमलने स्टम्पमागे ३० फलंदाजांना बाद केलेय. भारतीय विकेटकिपरमध्ये धोनीनंतर ऋषभ पंतच्या नावावर स्टम्पमागे सर्वाधिक विकेट आहेत. पंतने ११ सामन्यात १२ फलंदाजांना बाद केले आहे.

# लग्नाच्या चर्चांवर सानियाच्या वडिलांनी सोडले मौन





**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सानिया मिर्झा आणि मोहम्मद शमी म्हणजे क्रीडा क्षेत्रातील दोन प्रसिद्ध चेहरे. दोघांनीही भारताचे प्रतिनिधित्व करताना तिरंग्याची शान वाढवली. मोहम्मद शमीने क्रिकेटमध्ये तर सानिया मिर्झाने टेनिसमध्ये आपला ठसा उमटवला. खरे तर दोन्हीही स्टार खेळाडू त्यांच्या वैयक्तिक जीवनामुळे चर्चेत असतात. सानिया मिर्झा आणि पाकिस्तानी क्रिकेटर शोएब मलिक यांच्यात घटस्फोट झाला आहे, तर मोहम्मद शमीदेखील त्याची पत्नी हसीन जहाँपासून विभक्त झाला आहे. त्यामुळे शमी आणि सानिया हे दोघे लग्न करणार असल्याची चर्चा मागील काही कालावधीपासून रंगली आहे. अशातच आता सानियाचे वडील इमरान मिर्झा यांनी याप्रकरणी मौन सोडले आहे.

वन डे विश्वचषक २०२३मध्ये मोहम्मद शमीने शानदार कामगिरी करताना सर्वाधिक बळी घेतले. सानिया मिर्झा मागील काही कालावधीपासून खूप चर्चेत आहे. तिचा माजी पती शोएब मलिकने पाकिस्तानातील आघाडीची अभिनेत्री सना जावेदशी विवाहगाठ बांधली.

शोएबने तिसऱ्यांदा तर सनाने दुसऱ्यांदा लग्न केले, मात्र सानिया मिर्झा आणि मोहम्मद शमी हे लग्न करणार असल्याची चर्चा रंगली असताना सानियाचे वडील इमरान मिर्झा यांनी ही चर्चा म्हणजे केवळ अफवा असल्याचे म्हटले. इमरान मिर्झा म्हणाले की, हे सर्वकाही खोटे आहे, सानिया शमीला कधी भेटली देखील नाही. सानियाचे वडील इमरान हे एनडीटीव्ही या वृत्तवाहिनीशी बोलत होते.

# अफगाणिस्तानच्या खेळाडूंवर स्वत: स्वयंपाक करण्याची वेळ

**वेस्ट इंडिज : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तान संघ टी-२० वर्ल्डकपसाठी बार्बाडोसमध्ये असून यावर त्यांच्यावर स्वत:च आपला स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे. टीम हॉटेलमध्ये हलाल मांस उपलब्ध नसल्याने खेळाडूच शेफ झाले आहेत.

अफगाणिस्तान संघ टी-२० वर्ल्डकपच्या सुपर-८मध्ये पोहचला असून सध्या वेस्ट इंडिजमधील बार्बाडोसमध्ये आहे, मात्र या वेळी त्यांच्या टीम हॉटेलमध्ये हलाल मांस उपलब्ध नसल्याने खेळाडूंवर शेफ होण्याची वेळ आली आहे. अफगाणिस्तान खेळाडूंच्या आहारात हलाल मांस अनिवार्य असून, तेच उपलब्ध नसल्याने खेळाडूंवर स्वत: स्वयंपाक करणे किवा मग बाहेर जाऊन खाणे हे दोनच पर्याय शिल्लक राहिले होते. अफगाणिस्तान संघातील काही खेळाडूंनी ही समस्या सोडवण्यासाठी प्रकरण आपल्याच हातात घेण्याचे ठरवले.

भारतातील चांगल्या आदरातिथ्याचा अनुभव घेतल्यानंतर अफगाणिस्तान संघ टी-२० विश्वचषक २०२४ साठी वेस्ट इंडिजमध्ये दाखल झाला आहे. तथापि, ब्रिजटाऊन हॉटेलमध्ये उपलब्ध असलेले मांस हलाल आहे की नाही याबद्दल अनिश्चितता होती. हलाल मांस कॅरिबियन बेटावर उपलब्ध आहे, परंतु सर्व हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सच्या मेनूमध्ये ते आहे की नाही हे निश्चित नाही.

# मुंबई इंडियन्स फ्रँचायझीने १४ खेळाडूंना केले रिटेन

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमिअर लीग २०२५च्या पर्वापूर्वी मेगा ऑक्शन होणार आहे आणि त्यासाठी इउउख प्रत्येक फ्रँचायझीला नेमक्या किती खेळाडूंना संघात कायम राखण्याची संधी देतात याची उत्सुकता आहे. त्यामुळे आयपीएल २०२५ मध्ये सर्व फ्रँचायझीमध्ये बरीच उलथापालथ झालेली पाहायला मिळेल, पण त्याआधी टी-२०च्या तिसऱ्या सीझनचे काउंटडाउन सुरू झाले आहे आणि या लीगममध्ये मुंबई इंडियन्स फ्रँचायझीच्या एमआय एमिरेट्स संघाने त्यांच्या रिटेन (संघात कायम राखलेल्या) केलेल्या व रिलीज (करारमुक्त) केलेल्या खेळाडूंची नावे जाहीर केली आहेत.

२०२४ च्या चॅम्पियन्स संघाने १४ खेळाडूंना पुढील हंगामापूर्वी कायम ठेवले आहे. निकोलस पूरन, किरॉन पोलार्ड, ड्वेन ब्राव्हो आदी स्टार खेळाडूंचा रिटेन लिस्टमध्ये सहभाग आहे. लीगच्या नियमांनुसार, फ्रँचायझींना जास्तीत जास्त दोन अमेरिकेच्या खेळाडूंना कायम ठेवण्याचा पर्याय होता. मागील आयपीएल टी-२०सीझनमधील



तरुण खेळाडू मोहम्मद वसीम आणि मुहम्मद रोहिद यांनी प्राभावी कामगिरी केली होती. टी-२०चा तिसरा सीझन ११ जानेवारी २०२५ रोजी सुरू होणार आहे, अंतिम सामना ९ फेब्रुवारी २०२५ रोजी खेळवला जाणार आहे.

**रिलीज केलेल्या खेळाडूंची यादी**

अंबाती रायुडू, आसिफ खान, कोरी अँडरसन, भानुका राजपक्षे, ख्रिस्तोफर बेंजामिन, मॅकेनी क्लार्क, मोनांक पटेल, ओडियन स्मिथ, ट्रेंट बोल्ट, रीस टोपली, टिम डेव्हिड, विल स्मीड, जहूर खान

# अजिंक्य रहाणेची पत्नीसोबत भटकंती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा स्टार खेळाडू अजिंक्य रहाणे सोशल मीडियावर नेहमी सक्रिय असतो. त्याच्यापेक्षा जास्त त्याची पत्नी राधिका धोपावकर सक्रिय असते. आता या मराठमोळ्या जोडीने भटकंतीचा फोटो शेअर केला आहे.

अजिंक्य आणि राधिकाने शेअर केलेल्या फोटोमध्ये हे दोघे निसर्गरम्य वातावरणात तल्लीन झाल्याचे दिसते. आम्ही असलेल्या ठिकाणच्या दृश्याने सेल्फी काढण्यासाठी भाग पाडले, अशा आशयाचे कॅप्शन त्यांनी दिले आहे. राधिका आणि अजिंक्य यांच्या मागे असलेले निसर्गाचे अप्रतिम सौंदर्य पहायला मिळते.

सामन्यादरम्यान राधिका अनेकदा रहाणेला चीअर करताना प्रेक्षक गॅलरीत दिसली आहे. त्याचे फोटो, व्हिडीओ ती अपलोड करीत असते. अजिंक्य आणि राधिका यांना दोन अपत्य आहेत. अजिंक्य रहाणे आणि राधिका धोपावकर यांची प्रेमकहाणी जुन्या बॉलिवूड चित्रपटांची आठवण करून देणारी आहे.

# पाकिस्तानसाठी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकायची आहे -शोएब मलिक

**कराची : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप २०२४मधून पाकिस्तानचा संघ बाहेर झाला आहे. साखळी फेरीत अमेरिका आणि भारताकडून झालेल्या पराभवामुळे शेजाऱ्यांना घरचा रस्ता धरावा लागला. पाकिस्तानी संघ स्पर्धेबाहेर होताच चाहत्यांसह माजी खेळाडू बाबर आझमच्या संघावर टीकास्त्र सोडत आहेत. अशातच पाकिस्तानचा खेळाडू शोएब मलिकने एक मोठे विधान केले. पुन्हा एकदा पाकिस्तानचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आपण सज्ज असल्याचे त्याने सांगितले.

पाकिस्तानातील एका वृत्तवाहिनीशी बोलताना शोएब मलिकने सांगितले की, मला पुन्हा एकदा पाकिस्तानच्या राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करायचे आहे. मी आगामी काळात होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी उपलब्ध आहे. मी माझ्या देशासाठी सर्वतोपरी प्रयत्न



करेन. मला पाकिस्तानसाठी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकायची आहे.

दरम्यान, चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे यजमानपद पाकिस्तानकडे आहे. शेजारील देशात होणाऱ्या या स्पर्धेसाठी टीम इंडिया पाकिस्तानमध्ये जाणार का हे पाहण्याजोगे असेल, पण जाणकारांच्या म्हणण्यानुसार, या वेळीदेखील भारतीय संघाचे सामने तटस्थ ठिकाणी खेळवले जातील. पाकिस्तानचा माजी कर्णधार शोएब मोठ्या कालावधीपासून राष्ट्रीय संघातून बाहेर आहे, मात्र अद्याप त्याने निवृत्तीची घोषणा केली नाही. त्याने २०२१मध्ये बांगलादेशविरूद्ध शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला आहे.

अलीकडेच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने चॅम्पियन्स ट्रॉफीचे संभावित वेळापत्रक आयसीसीकडे सोपवले असून, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना लाहोरमध्ये खेळवला जाईल असे सुचवले आहे. 'क्रिकबज'ने दिलेल्या वृत्तानुसार, पीसीबीने आयसीसीकडे चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चे संभाव्य वेळापत्रक सोपवले आहे. या वेळापत्रकानुसार भारत आणि पाकिस्तान हा सामना लाहोर येथे होईल. ही लढत साखळी फेरीतील १५ सामन्यांमध्ये सर्वात शेवटी असेल, मात्र अद्याप सामन्याची तारीख समोर आली नाही, तसेच कराची, रावळपिंडी आणि लाहोर येथे चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने होतील असेही पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने स्पष्ट केले.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com